# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २१ एप्रिल २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -२२७

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • FRIDAY 21 APRIL 2023

adhunikkesari.com Adhunik Kesari

YEAR-02 • ISSUE-227 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-5


# आमदार कांदे-धात्रक गटात राडा

## मनमाड बाजार समिती निवडणूक

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीला गालबोट लागले. उमेदवारी अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी बाजार समितीच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिध्दार्थ मोरे आणि पोलिसांसमोरच दोन गटात हाणामारी झाली. शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांचा गट आणि उध्दव ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गणेश धात्रक यांच्या गटात ही हाणामारी झाली.**

गुरुवारी अर्ज माघारीच्या दिवशी बाजार समिती प्रांगणात गर्दी उसळली होती. निवडणूक अधिकारी डॉ. सिध्दार्थ मोरे यांच्या उपस्थितीत माघारीची प्रक्रिया सुरू होती. एका उमेदवाराने दोन ठिकाणी अर्ज भरला होता. तो बाहेरगावी असल्याने त्याला माघारीसाठी येता आले नाही. या माघारीबाबत उमेदवाराशी दृकश्राव्य माध्यमातून संपर्क साधला गेला. परंतु, ते ग्राह्य धरण्यात आले नाही. त्यामुळे त्याच्यावतीने त्याची मुलगी आणि अनुमोदक, सूचक माघारीसाठी सभागृहात पाठविण्यात आले होते. यावर आक्षेप घेत माघारीचा अर्ज स्विकारू नये यावरून परस्परांकडे रागाने पाहिल्याचे कारण पुढे करत दोन गटात बाचाबाची झाली. काळी वेळातच त्याचे रुपांतर हाणामारीत झाले. दोन्ही गट एकमेकांना भिडल्याने चांगलाच गोंधळ उडाला. निवडणूक अधिकारी डॉ. मोरे यांच्या समोर टेबलवर चढून हाणामारी झाली. पोलीस निरीक्षक बाळासाहेब थोरात यांनी मध्यस्ती करीत वाद आटोक्यात आणला. त्यानंतर अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाली. यावेळी चंद्रकांत गोगड, गंगाधर बिडगर, गणेश धात्रक, पिंटू नाईक, माधव शेलार, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख फरहान खान, शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख किरण देवरे, योगेश पाटील, साईनाथ गिडगे, मयूर बोरसे आदींसह शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते. या घटनाक्रमातून निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे दिसू लागली आहे.



**अटीतटीची लढत :** मनमाड बाजार समितीच्या १८ जागांसाठी १२५ उमेदवारांनी अर्ज भरले. माघारीच्या दिवशी ८४ उमेदवारांनी रिंगणातून माघार घेतली असून आता १८ जागा आणि ४१ उमेदवार अशी अटीतटीची लढत होणार आहे. विद्यमान आमदार सुहास कांदे यांनी बाजार समितीचे काही माजी सभापती आणि संचालकांसह तुल्यबळ उमेदवार उभे केले आहेत. त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे माजी आमदार राजेंद्र देशमुख, जगन्नाथ धात्रक, अनिल आहेर, संजय पवार, पंकज भुजबळ आणि ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गणेश धात्रक अशी तुल्यबळ लढत होणार आहे.

# माया कोडनानी, बाबू बजरंगी निर्दोष

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद:** गुजरात दंगलीतील नरोडा हत्याकांडातील सर्व आरोपींची अहमदाबादमधील विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. 11 जणांची हत्या झालेल्या या प्रकरणात गुजरातच्या माजी मंत्री माया कोडनानी आणि बाबू बजरंगी यांची सुटका करण्यात आली. या प्रकरणातील सर्वच म्हणजे 86 आरोपींची सुटका करण्यात आली आहे. गुजरात दंगली प्रकरणातील हा अत्यंत महत्त्वाचा निकाल समजला जातो. 28 फेब्रुवारी 2002 रोजी अहमदाबाद शहराजवळील नरोडा येथे झालेल्या जातीय हिंसाचारात 11 लोक मारले गेले. या प्रकरणी गुजरातच्या माजी मंत्री आणि भाजप नेत्या माया कोडनानी, बजरंग दलाचे नेते बाबू बजरंगी आणि विश्व हिंदू परिषदेचे नेते जयदीप पटेल यांच्यासह 86 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यापैकी 18 जणांचा मृत्यू झाला आहे. विशेष न्यायमूर्ती एसके बक्षी यांच्या न्यायालयाने या प्रकरणी सर्व आरोपींना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले. सर्व आरोपी सध्या जामिनावर बाहेर आहेत. 2010 मध्ये सुरू झालेल्या खटल्यादरम्यान, फिर्यादी आणि बचाव पक्षाने 187 साक्षीदार आणि 57 प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले आणि सुमारे 13 वर्षे चाललेल्या या खटल्याची सलग सहा न्यायाधीशांनी सुनावणी केली.

गोध्रा घटनेच्या दुसऱ्या दिवशी नरोडा येथे दंगल गोध्रा घटनेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच 28 फेब्रुवारीला नरोडा गावात बंदची घोषणा करण्यात आली होती. दरम्यान सकाळी नऊच्या सुमारास लोकांच्या जमावाने बाजारपेठ बंद करण्यास सुरुवात केली आणि हिंसाचार उसळला.

जमावात सामील असलेल्या लोकांनी जाळपोळ सुरू केली, दगडफेक करून तोडफोड केली आणि यात 11 जणांचा बळी गेला. यानंतर जवळच्या पाटिया गावातही दंगल पसरली होती, येथेही हत्याकांड घडले. या दोन भागात 97 जणांचा मृत्यू झाला होता. या हत्याकांडानंतर संपूर्ण गुजरातमध्ये दंगली उसळल्या. या प्रकरणात एसआयटीने तत्कालीन भाजप आमदार माया कोडनानी यांना मुख्य आरोपी बनवले होते. मात्र, या प्रकरणात आता त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

# रेल्वेगाड्यांना विलंब, प्रवाशांचा संताप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** गोंदिया-चांदाफोर्ट या रेल्वेमार्गावर गेल्या महिनाभरापासून समस्येत वाढ झाली आहे. या मार्गावरील पॅसेंजर गाडया दररोज दोन ते तीन तास उशिरा धावत आहेत. गुरुवारी सकाळीसुद्धा असाच प्रकार घडल्याने संतप्त प्रवाशांनी गोंदिया-चांदाफोर्ट मार्गावरील नवेगावबांध रेल्वे स्थानकावर गोंदिया बल्लारशा पॅसेंजर गाडी अडवली.

गोंदियाहून सकाळी ७:३० वाजता बल्लारशाकडे जाणारी गोंदिया-बल्लारशा ही गाडी गुरुवारी सकाळी नियोजित वेळी ९:५० ला नवेगावबांध रेल्वे स्थानकावर पोहचली. मात्र या रेल्वे स्थानकावरून ही गाडी पुढील प्रवासासाठी रवाना न होता याच ठिकाणी दीड तास थांबवून ठेवण्यात आली. त्यामुळे प्रवाशांना त्यांच्या नियोजित ठिकाणी पोहचण्यास विलंब झाला. प्रवाशांचा संताप अनावर झाला. संतप्त प्रवाशांनी रूळावर उतरून आपला संताप व्यक्त केला.

# तमाशा लोककलेला लागली घरघर

## तमाशा पुढे ऑर्केष्ट्राचे मोठे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

सुशिल गायकवाड

**लोणंद :** गावच्या यात्रांच्या निमित्ताने मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जात असतात. यामध्ये लोकनाट्य तमाशा मंडळ हे फार वर्षापूर्वी पासून उदयास आलेली कलेची जुनी परंपरा आजही गावच्या यात्रेत अनुभवण्यास मिळत असते. परंतु हल्लीचा काळ आणि हल्लीचा प्रेक्षकवर्ग हा वेगळ्याच मूड मधला पाहायला मिळत आहे. त्यामुळे लोकनाट्य तमाशा कलावंतांची तमाशानगरी सुद्धा पाठीमागे पडु लागली आहे. पूर्वी जी लोकनाट्य तमाशा बघायला गर्दी व्हायची ती गर्दी मात्र कमी होत चालली आहे. जुनी लोकं आवडीने तमाशा पाहत असतील परंतु हल्ली तरुणाईला नव्या बदलातील नव्या कार्यक्रमांची ओढ लागलेली असते. आज लोकनाट्य तमाशा पुढे ऑर्केष्ट्राचे मोठे आव्हान येऊन ठेपलेलं आहे. तमाशाने माणूस बिघडत नाही आणि कीर्तनाने माणूस सुधारत ही नाही असे म्हटले जात असताना तमाशा कलावंतांकडून ही प्रबोधन मनोरंजन आदीसह विविध विषय मांडण्याचा प्रयत्न हा केला जात असतोच. हल्ली एकाच जागेवर जास्त काळ बसून कार्यक्रम पाहण्याची मानसिकता लोकांच्या मध्ये राहिलेली दिसत नाही. लोकनाट्य तमाशाने ही त्यांचा काळ गाजवत खूप मोठे योगदान दिलेले आहे. हे विसरता येणार नाही. तमाशापुढे ही खूप आव्हाने समोर आली असली तरी तमाशा कलावंतांनी आपले अस्तित्व कायम टिकवून ठेवण्याची प्रयत्न करत राहिले पाहिजे. बदलता काळ, बदलते प्रेक्षक वर्ग यांच्या समोर येत असताना नक्कीच तारेवरची कसरत तर करावीच लागणार आहे. कोरोना मुळे तमाशा कलावंत यांच्या वर मोठी बिकट परिस्थिती आली होती. आता कुठे तरी तमाशाचे कार्यक्रम होत असल्याने काही कमी बजेटच्या रकमेत का होईना लोकनाट्यचे सादरीकरण करावे लागत आहे.यात्रांच्या मौसम मुळे सुपारी मिळत असताना चार पैसे मिळत आहेत. अशातच रसिकांची तमाशाकडे पाठ फिरायला लागल्यावर हे तमाशे टिकायचे तरी कसे ? एखाद्या कार्यक्रमाकडे प्रेक्षकांची पाठ फिरते तेंव्हा त्यासाठी अनेक कारणे आपल्या समोर असतात. पूर्वी तमाशा सोबत स्पर्धा करण्यासाठी इतर मनोरंजनाची साधने नव्हती परंतू तमाशा सोबतच संगीत बारीच्या पार्ट्या शिवाय ऑर्केष्ट्रा सुद्धा आपली कला यात्रेच्या काळात दाखवत असतात. थोडक्यात तमाशाची जागा ऑर्केष्ट्राने घेतली असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. बदलत्या प्रेक्षक वर्गानुसार आपल्यात बदल करून घेणे हे लोकनाट्य तमाशांना हे जमले पाहिजे. तमाशा विरुद्ध ऑर्केष्ट्रा हेच पाहायला मिळत आहे.तमाशाची जागा ऑर्केष्ट्राने घेतली तर नाही ना ? तमाशात आणि ऑर्केष्ट्रात नृत्य करणाऱ्या नर्तिका यांमध्ये सुद्धा वेगवेगळी वागणूक प्रेक्षक वर्गाकडून मिळत असते.

**कोरोना रोगाने यात्रा उत्सव बंद होता . तेव्हा तमाशा कलावंतांची मोठी आर्थिक घडी मोडली होती .आजही ही ती व्यवस्थितपणे बसलेली नाही .तमाशा कलावंतांचे जे कार्यक्रम यात्रा काळात होत असल्याचे त्याचे प्रमाण कमी होत गेलेले आहे . कोरोनाच्या लॉकडाउनलोड सोबतच आज तमाशाच्या कार्यक्रमांना सुद्धा लॉकडाऊनच पडल्यागत अवस्था झाली आहे .यात्रा काळात ज्या कार्यक्रमाला आवर्जून पसंती दर्शविली जाते ते म्हणजे तमाशा .हल्ली आता यात ऑर्केष्ट्राचा ही समावेश झालेला आहे .पूर्वी तमाशा हा रात्री सूरु झाला की पहाटे उजडेपर्यंत चालायचा .आता तमाशा पाहण्यातच लोकांना जास्त रस उरलेला दिसत नाही .**


राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसा. लि.,परळी वैजनाथ

• बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय: मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड.
कार्पोरेट ऑफिस: 1 ला मजला, अपना बाजार, जालना रोड शाखा, छ. संभाजी नगर.
Contact no : 7875113333 /9421788167 Email:rajasthanimultistate.nashik@gmail.com

सस्नेह नमस्कार,
आपल्या सर्वांच्या सहकार्याने व विश्वासात्मक पाठबळावर आणखी एक पाऊल पुढे टाकत आहोत.
नाशिक शहर शाखा.

॥ भव्य शुभारंभ ॥

आशिर्वाद व उद्घाटक :
मा. श्री. तुलसीदासजी गुट्टे महाराज
(सिद्धीविनायक मानव कल्याण मिशन, नाशिक)

प्रमुख पाहुणे :
मा. श्री. विश्वास जयदेव ठाकुर — अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट को ऑप बँक असोसिएशन
मा. श्री. बी. बी. चांडक — उपाध्यक्ष, लोकमत मिडीया प्रा. लि. नाशिक

प्रमुख उपस्थिती
श्री. चंदुलाल मोहनलाल बियाणी — संस्था अध्यक्ष

या निमित्त श्री सत्यनारायण महापुजेचा कार्यक्रम आयोजित केला आहे.
तरी आपण तिर्थप्रसादाला व अल्पोहारास उपस्थित रहावे, ही नम्र विनंती,
आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत.

दिनांक : शनिवार, 22 एप्रिल 2023 वेळ : स. 11.00 ते दु. 05.00 पर्यंत


स्थळ :
श्रीकृष्ण अव्हेन्यु, बनकर चौक, वाजपेयी शाळेजवळ, काठे गल्ली, द्वारका, नाशिक.

विनीत :

संचालक मंडळ
श्री. चंदुलाल मोहनलाल बियाणी (अध्यक्ष) | श्री. बालचंद सोभागचंद लोढा (उपाध्यक्ष) | श्री. बद्रीनारायण छगनलाल बाहेती (सचिव)
श्री. प्रल्हाद दुर्गाप्रसाद अग्रवाल (सहसचिव) | श्री. विजयप्रकाश विठ्ठलदास लड्डा (कोषाध्यक्ष) | श्री. जगदीश मोहनलाल बियाणी (कार्यकारी संचालक)

संचालक
सौ. प्रेमलता बद्रीनारायणजी बाहेती | सौ. कल्पना चंदुलाल बियाणी | श्री. अशोक हरिकीशनजी जाजू
श्री. सतिष सत्यनारायण सारडा | श्री. अजय उत्तमराव पुजारी | श्री. नामदेव गणपत रोडे
श्री. व्यंकटेश बापुराव कुलकर्णी (मुख्य कार्यकारी अधिकारी) | सौ. अर्चना मुंदडा (महाव्यवस्थापक) | श्री. राध्येशाम झंवर (विभागीय व्यवस्थापक) | श्री. अशोक मुंदडा (शाखा व्यवस्थापक)

नाशिक शाखा सल्लागार समिती
श्री. संतोष बद्रीनारायण मुंदडा | श्री. अनंत शामलाल राठी | श्री. उमेश रामकृष्ण मुंदडा | श्री. विनोद हिरालाल जाजू, सीए
श्री. अजय रामगोपाल मोदानी | श्री. जितेंद्र लक्ष्मीनारायण सोमाणी | श्री. सुरेश मनसुखलाल बोथरा | श्री. चेतन दामोदर व्यास
श्री. गौरव गिरीश जैन | श्री. जिग्नेश रमेशभाई पटेल | श्री. पंकज व्यंकटराव देशपांडे | श्री. सचिन देविदास देशमुख,ॲड
श्री. सुनील उद्धवराव महामुनी | श्री. नितीन रमेश भोसले | श्री. मिलिंद निवृत्ती मानकर | श्री. मुर्तुजा तुराभभाई कांचवाला.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# रामका गुणगान करिये

आधुनिक केसरी

वनात गेल्यानंतर अनायासे ही इच्छा पूर्ण होईल, ' असे अत्यंत समजूतदारपणा आणि त्याच्या मनाचे औदार्य दाखवणारे उद्गार तो काढतो. वनात असतानाही भरत त्याला भेटायला येतो. अयोध्येला परत येण्यासाठी खूप विनवणी करतो. परंतु राम त्याला निर्धारपूर्वक नकार देतो. शेवटचे अस्त्र म्हणून तो वसिष्ठांची पण तशीच इच्छा आहे असे रामाला सांगतो. पण राम भरताला म्हणतो, ' एकदा आपण वडिलांना जे वचन दिले ते पाळले नाही तर रघुकुलाच्या कीर्तीला कलंक लागेल. रघुकुल रीत सदा चली आई, प्राण जाय पर वचन न जाई .' हे ब्रीद कसोशीने पाळणारा राम आहे. या ठिकाणी दुसरा कोणीही असता तर भावाने विनंती केली, वसिष्ठांचीही तशीच इच्छा होती, असे सोयीस्कर उद्गार काढून अयोध्येला परत जाऊ शकला असता.

रामाने एकदा ज्याला आपले म्हटले, हृदयाशी धरले, त्याची साथ कधीच सोडली नाही. मग तो गुहक असेल, निषादराज असेल, सुग्रीव असेल किंवा बिभीषण असेल. शरणागताला आश्रय देणे, प्रसंगी आपल्या प्राणांचे मोल त्यासाठी द्यायला तयार होणे हे रामाचे ब्रीद होते. मित्र जोडताना जातपात, उच्चनीच, स्त्रीपुरुष असा भेद रामाने कधीच केला नाही. रामाने रावणावर विजय मिळवला, लंका जिंकली. ठरवले असते तर तो लंकेचा राजा होऊ शकला होता. पण तो मोह त्याला नव्हता. रावण जर रामाला शरण आला असता, तर रामाने त्याचेही मनपरिवर्तन केले असते. त्याचे राज्य त्याला परत दिले असते. पण तसे व्हायचे नव्हते. कोणी तरी रामाला विचारले, ' तुम्ही बिभीषणाला राज्य द्यायचे वचन दिले आणि ते त्याला दिले. पण जर रावण तुम्हाला शरण आला असता, आणि त्याने राज्याची मागणी केली असती तर काय ?' अशा वेळी रामाने फार सुंदर उत्तर दिले आहे.





## आनंदी पहाट

# वैचारिक प्रगल्भता प्राप्त होणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अगदी प्राचीन काळापासूनच आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसं विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरतं निमित्तच ठरत असतं. आयुष्याच्या प्रवासांत सोबत हवी असते, ती विचारांचीच. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतंच असं नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचंच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचं दिसून येत असतं. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे ? असा विचार कधी येतो का हो आपल्या मनांत ? विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसं मिळेल ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणं महत्वाचं ठरतं. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक आणि मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा आणि आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झालं, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचं दर्शन होतंच राहतं. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसं पहायला हवं; प्रत्येक नातं जवळचं आहे, फक्त ते उमजायला हवं; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसं समजायला हवं. ते समाध आणि आनंद आपल्याला मिळत राहायला हव्यात म्हणून सकारात्मक विचार, आचार आणि संस्कार ह्याचं महत्व आपल्याला कळणं आणि अवगत होणं आवश्यक असतं.



आधुनिक केसरी

**लाभला प्रसाद | दास झालो ||**

माय-बापे माझे | ठेवियले नांव ||
अंतरीची धाव | ज्ञानेश्वर ||१||
माधव-विठ्ठल | बाप शोभे वर ||
ऐसा विश्वंभर | योग साधी ||२||
कुळाचा उध्दार | कुळकर्णी नावे ||
वतन वैष्णवे | पुण्यवंत ||३||
सखा झाला तुका | पुण्य फळा आले ||
आता सुखावले | भाग्य माझे ||४||
माऊलीच्या नामे | साधता संवाद ||
लाभला प्रसाद | दास झालो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

नीलाम्बरीं त्रिनेत्रां
त्वांनीलकण्ठेशभामिनीम्।
वन्देऽहं स्वर्णवर्णे त्वां नीलाक्षीं
नायिकां पराम् ।।१ ।।

हे स्वर्णवर्णे, मी नीलांबरी, त्रिनेत्रा, श्रीशिवपत्नी, नीलाक्षी, श्रेष्ठ, (जगत) नायिका अशा तुला वंदन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

प्रथम सत्य संकल्प दृढ़, मैं निश्चय कर काज ।
त्रिविध ताप से छूट कर, मिलों महाप्रभु काज
।।३९।।(स्वर्वेद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय)
०५/०४/३९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :

प्रथम सत्यसंकल्प दृढ असला पाहिजे की मी हे कार्य अवश्य पूर्ण करीन, मग ते कार्य पुरुषार्थ केल्यावर सफल होते. अशाच प्रकारे योगाच्या पुरुषार्थाद्वारे याच जीवनात त्रिविध तापां पासून सुटून महाप्रभूची प्राप्ती करीन, असा दृढ, सत्यसंकल्प निश्चय असला पाहिजे. जीवनात परमेश्वराची प्राप्ती हेच मुख्य कार्य आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## देव असा ओळखावा!

आधुनिक केसरी

मित्रांनो जन्माला आलेलं प्रत्येक मुल,प्रत्येक जीव हा देवस्वरूप आहे असं समर्थ सांगतात. वनस्पती, पानेफुले फळे या प्रत्येकात जीव आहे आणि हा जीव म्हणजेच "देव"होय.ही संकल्पना समर्थांची आहे. खरं सांगु समर्थांची ही विचारवाणी समजणं आपल्या सारख्या सामान्य लोकांना केवळ अशक्य आहे.त्यांनी तर प्रत्येकात देव पहायला शिकवले आहे. जे लोक अहंपणाचा आव आणतात आणि देव जगात नाही असं म्हणतात त्यांनी त्यांच्या आयुष्यात जेव्हा वेळ मिळेल तेव्हा एकदा तरी दासबोध वाचावा. म्हणजे त्यांचा गर्व कमी होईल. कारण समर्थांनी तर प्रत्येक जी्वात देव बघीतला आहे.सद्विचारांनी भारलेल्या माणसाला तर चराचरात देव दिसतो. अहंपण असलेल्या व गर्वाने बधीर झालेल्या लोकांच्या पर्यन्त देव पोहचत नाही. देव कुणाला म्हणावे! हे अपरंपार विश्व व त्यामधील अनंत प्रकारचे जीवप्राणी ज्यांच्या सत्तेमुळे निर्माण होतात व जगतात तो खरा देव. देवाच्या सत्तेने सगळे द्रुष्य विश्व युगानंयुगे अव्याहत पणे तगते परंतु स्वतः देवमात्र अद्रुष्य व नामरूपविरहित आहे आणि हाच देव आहे. जो अनाकलनीय, अलौकिक, शाश्वत व स्थावर आहे पण तो चराचरातील घटना मध्ये आहे. त्याची जाणीव व नेणीव आपल्याला जगण्याची उमेद देते सामर्थ्य देते. तो देव होय.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रपंचातले विषयसुख हे खरे सुख नाही

आधुनिक केसरी

मनुष्य जगात कितीही मोठा असला तरी त्याच्या प्रपंचात काहीतरी न्यून असतेच. न्यूनता नाही असा प्रपंचच नाही. एखादा प्रापंचिक 'माझा प्रपंच पूर्ण आहे ' म्हणून सांगणारा भेटेल, परंतु 'चालले आहे असेच चालावे, यात कमी तर नाही ना कधी पडणार ?' अशी त्याला काळजी असतेच; म्हणजे त्याला खरे सुख असे नसतेच. एखादा अत्यंत विषयी, त्याला कदाचित् काळजी नसेल. दारूच्या धुंदीत असणाऱ्याला राजाचीही पर्वा नसते, वस्त्राचीही शुद्ध नसते, आणि तो आपल्याच धुंदीत, आनंदात असतो; पण हे सर्व त्याची धुंदी उतरली नाही तोपर्यंतच. विषयातले सुख परावलंबी, विषयांवर अवलंबून असते. विषय हे नश्वर, आपल्यापासून कधी तरी जाणार; निदान आपल्याला तरी त्यांच्यापासून एक दिवस जावे लागणार. दुसरी गोष्ट म्हणजे, विषयाचे सुख इंद्रियाधीन असते. इंद्रिये विकल झाली म्हणजे सुख कसे मिळणार ? उद्या आपण मरणार हे समजले की कोणते विषय आपल्याला सुख देतील ? सारांश, विषयात सुख नाही. जे सुख होतेसे वाटते ते आपल्यातच असते, आणि ते विषयापासून मिळते अशी आपली फसवणूक मात्र होते. तर मग सुख कशात आहे ? पुष्कळ वस्तू पुष्कळ मिळाल्या तर पुष्कळ सुख मिळते हा भ्रम आहे. खरे किंवा पुष्कळ सुख म्हणजे कायमचे, सनातन सुख होय. ते सनातन वस्तूपाशीच, म्हणजे भगवंतापाशीच असते. आपल्याप्रमाणे पशूंनाही विषयसुख आहे; त्यांच्यात आणि आपल्यात फरक तो कोणता ? मी कोण, कशासाठी आलो, असा विचार करणे याला सारासार विचार म्हणतात. प्रपंचातही आपण विचार करतोच; कशात आपला फायदा आहे, कशात आपला तोटा आहे, हे बघतो. पण सर्वच असार, त्यात सार ते कुठुन, कसे येणार ? असलेल्या परिस्थितीत आपण समाधान मानीत नाही. त्याहून अधिक सुखाच्या स्थितीची इच्छा धरतो. देवाची भक्ति करणे, संतांकडे जाणे, हे सुद्धा विषय मिळविण्याकरिता आपण करतो; मग ही आपली सेवा, भक्ति विषयांची झाली का संतांची ? देव, संत, यांचा उपयोग इतर गोष्टींप्रमाणे विषय मिळविण्याचे साधन म्हणून नाही का आपण करीत ? मांजर आडवे गेले की, आपले काम होणार नाही, ही भगवंताची सूचना आहे, असे समजून आपण परततो; पण एक बायको मेली की दुसरी करण्याच्या विचाराला लागतो !



## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

हें चि देवाचें दर्शन । सदा राहे समाधान ।।ध्रु.।।
शांतीची वसती । तेथें खुंटे काळगती ।।२ ।।
आली ऊर्मी साहे । तुका म्हणे थोडें आहे ।।३ ।।
थोडें आहे थोडें आहे । चित्त साहे जालिया ।।१ ।।
हर्षामर्ष नाहीं अंगीं । पांडुरंगीं सरलें तें ।।ध्रु.।।
अवघ्या साधनांचें सार । न लगे फार शोधावें ।।२ ।।
तुका म्हणे लटिकें पाहें । सांडीं देह अभिमान ।।३ ।।
आतां उघडीं डोळे । जरी अद्यापि न कळे ।। तरी मातेचिये खोळे ।
दगड आला पोटासि ।।१ ।।

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २१ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई; लाखोंची दारू हस्तगत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** एलसीबीचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील व त्यांच्या पथकाने दारूची मोठी तस्करी रोखली. आर्वीकडून धुळ्याकडे येणाऱ्या वाहनातून सव्वा आठ लाखांच्या व्हीस्की व बिअरच्या २२५ खोके व बॉक्सचा दारूसाठा पकडला. त्याचबरोबर आयशर वाहन मिळून साडेअठरा लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यात दोघांना अटक केली आहे. हा सगळा दारू सॅनिटरी नॅपकीनच्या गोण्यांमागे लपवून आणला जात होता. पोलिसांनी तपासणी केली तेव्हा खोट्या पावत्या दाखवून आरोपींनी दिशाभूल करायचा प्रयत्न केला. मात्र एलसीबीला टीप मिळाली होती. त्यामुळे निरीक्षक हेमंत पाटील व त्यांच्या पथकाने आयशर वाहनाची तपासणी केली. तेव्हा हा दारूसाठा आढळून आला.
एलसीबीचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यूपी -८० /एफटी ९ ३ ९ ८ या क्रमांकाच्या आयशर वाहनामध्ये बेकायदेशिररित्या विदेशी दारुचे खोके भरुन हे वाहन आब- धुळे मार्गे सुरतकडे जात आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरून पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवधानफाटा येथे रस्त्यावर थांबून आर्वीकडुन धुळ्याकडे येणाऱ्या वाहनांची तपासणी केली. त्यावेळी वरील क्रमांकाचे वाहन धुळ्याकडे जात असल्याचे दिसल्याने अडथळा करुन थांबविले. ट्रक वरील चालक व क्लिनर यांना नाव गाव विचारता त्यांनी त्यांची नावे अर्जुन रामजीत बिंद (वय २४) व्यवसाय चालक रा. शेखाही पोस्ट- अधनपुर तह. शाहगंज जि. जौनपुर (उत्तरप्रदेश) सोमनाथ नाना कोळी (वय २६) व्यवसाय क्लिनर रा . खामखेडा, ता. शिरपूर, जि. धुळे असे असल्याचे सांगितले. दोघांना ट्रक मधील माला बाबत विचारपूस केली असता त्यांनी ट्रक मध्ये सॅनीटरी पॅड असल्याचे सांगून त्याबाबत मालाची बनावट बिल्टी हजर



केली . तथापी सदर ट्रक मध्ये बेकायदेशीर दारू साठा असल्याचा दाट संशयावरून सदर ट्रक व सदर दोन इसमांना ताब्यात घेवून पोलीस अधिक्षक कार्यालयात आणून ट्रक मधील माला बाबत खात्री केली असता सदर ट्रक मध्ये पाठी मागील साईडला सॅनीटरी पॅडच्या गोण्या भरल्याचे व समोरील बाजुस दारू व बिअरचे बॉक्स आढळले . त्यात ७ लाख ८१ हजार ८० रूपये किंमतीची देशी / विदेशी विविध कंपन्यांच्या व्हिक्सी दारुचे २०५ खोके त्यात एकुण ६८०४ नग बॉटल . तसेच ४० हजार ८०० रूपये किमतीची २० बॉक्स त्यात ८४० बॉटल तसेच १० लाख रूपये किमतीचा आयशर ट्रक व १२ हजार रूपये किमतीचे सॅनिटरी पॅडच्या पांढऱ्या रंगाच्या १२० गोण्या प्रत्येकी किंमत १०० रूपयांप्रमाणे तसेच १० हजार रुपये किमतीचे २ मोबाईल जप्त केले . यात ८ लाख २२ हजार ६०० किमतीची दारु व ईतर मुद्देमालासह १८ लाख ४४ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आरोपी विरूध्द मोहाडीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे. तसेच आरोपीने हा माल कोठून आणला व डिलेवरी कोठे देणार होता या चेनमध्ये आणखी कोण आरोपी आहेत या बाबत विचारपूस चालू आहे. ही कारवाई संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक, किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.अ.शा. चे पो.नि. हेमंत पाटील, बाळासाहेब सुर्यवंशी, संजय पाटील, संतोष हिरे, पोना पंकज खैरमोडे, महेंद्र सपकाळ, किशोर पाटील यांनी केली.




## मुख्यमंत्र्यांनी नगरविकासासाठी सर्वाधिक निधी दिला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नागरीकरणाला पूर्वी अभिशाप सजमला जायचा. परंतु, शहरात शिक्षण, आरोग्य, रोजगार तयार होत गेले. त्यामुळे शहरीकरण झपाट्याने वाढत गेले, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज म्हणाले. ते नगरविकास दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. मुख्यमंत्र्यांनी नगरविकासासाठी यंदा रेकॉर्डब्रेक निधी दिला असल्याचाही दावा केला आहे. तसेच, विकास आराखडा तयार केला तरी त्याची अंमलबजावणी गरेजचे असते असे नमूद करताना त्यांनी काही महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या कार्यावरही बोट ठेवले आहे. मी मुख्यमंत्री असताना नगरविकास खातं माझ्याकडे होते. महाविकास आघाडीच्या काळात ते खाते एकनाथ शिंदे यांच्याकडे गेले. त्यानंतर आता तेच मुख्यमंत्रीही आहेत. त्यांनी नगरविकास खात्यात चांगले लक्ष घातले आहे. शहरांमध्ये विकास आराखडे वेगाने मंजूर केले. काही वर्षांपूर्वी एकूण विकासाच्या प्रक्रियेत शहाराचा विकास आराखडा आणि विकास यात कोणताही संबंध नव्हते. परंतु, आता मंजूर झालेल्या विकास आराखड्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. राज्य आणि केंद्राच्या संकल्पनेतून घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अतिशय वेगाने सुरू आहे", असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी गेल्यावर्षी नगरविकास विभागात रेकॉर्ड निधी दिला. म्हणजेच आजपर्यंतचा सर्वात जास्त निधी. आज निधीची कमतरता नाही, पण कल्पकता आणि अंमलबजावणीची गरज आहे. मोठ्या प्रमाणात पैसा देण्यात येतो, पण तीन-चार वर्षे पैसा वापरला जात नाही. काही नगरपालिका, महानगरपालिका निधी मिळाल्यानंतर निविदाही काढत नाही. त्यामुळे यामध्ये पारदर्शिता आणण्याकरता निर्णय घ्यावा लागेल, असेही पुढे फडणवीसांनी स्पष्ट केले.

## राहुल गांधींची याचिका न्यायालयाने फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधींच्या अडचणीत वाढ झाली आहे. मोदी आडनावाच्या मानहानीप्रकरणी राहुल गांधींना सुरत कोर्टाने झटका दिला आहे. मानहानीच्या खटल्यात दोन वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेविरोधातील राहुल गांधींचा अर्ज सुरत कोर्टाने फेटाळला आहे. सुरत कोर्टाने दिलेल्या निर्णयाविरोधात राहुल गांधी आता हायकोर्टात दाद मागणार आहेत. सुरतच्या सत्र न्यायालयात याआधी हे प्रकरण 13 एप्रिल रोजी सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने हा निकाल राखून ठेवला होता. राहुल गांधींवरील खटल्याचे प्रकरण 2019 मध्ये बंगळुरू येथे निवडणूक रॅलीदरम्यान राहुल गांधींनी केलेल्या विधानाशी संबंधित आहे.

## ‘देव तारी त्याला कोण मारी’

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** नेपाळमधील अन्नपूर्ण पर्वतावरून उतरत असताना बेपत्ता झालेला भारतीय गिर्यारोहक अनुराग मालू (वय ३४) याचा तब्बल आठवड्याभरानंतर शोध लागला आहे. खाली उतरत असताना कॅम्प तीनजवळ तो खाली पडला होता. तेव्हापासून तो बेपत्ता होता. गेल्या आठवड्याभरापासून त्याला शोधण्याचं काम सुरू होतं. अखेर तो जिवंत सापडला असल्याची माहिती एएनआय या वृत्तसंस्थेने दिली आहे. अनुराग मालू जिवंत सापडला आहे. गंभीर अवस्थेत तो आम्हाला सापडले असून त्याला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, अशी प्रतिक्रिया त्याचा भाऊ सुधीर यांनी दिली. नेपाळमधील अन्नपूर्णा पर्वत जगातील दहाव्या क्रमाकांचे उंचावरील पर्वत आहे. या पर्वताच्या कॅम्प तीन येथून खाली कोसळल्यानंतर त्याला शोधण्यासाठी मोहिम जोरात सुरू होती. आठवडाभर अथक परिश्रम केल्यानंतर तो अनुराग जिवंत सापडल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. यामुळे ‘देव तारी त्याला कोण मारी’ या म्हणीची प्रचिती आली असल्याची प्रतिक्रिया सर्व स्तरांतून उमटत आहे. अनुराग मालू गेल्या आठवड्यात अन्नपूर्णा पर्वत चढण्यासाठी निघाला होता. १७ एप्रिलला खाली उतरत असताना ६,००० मीटर उंचीवर असताना तो खाली कोसळला. अनुराग मालू ८ हजार मीटरवरील सर्व १४ शिखरे आणि सातही खंडातील सात सर्वोच्च बिंदूंवर चढाई करण्याच्या मोहिमेवर होता. याच मोहिमेअंतर्गत तो अन्नपूर्ण पर्वतावर गिर्यारोहणासाठी गेला होता. अनुराग मालू (३४) हा राजस्थानच्या किशनगड येथील रहिवासी आहे. अनुराग मालू हा व्यवसायाने उद्योजक असून कॅम्प IV वरून परतत असताना कॅम्प III च्या खाली कोसळला.

## आरोग्य विमा महत्त्वाचा; योग्य पॉलिसी कशी खरेदी करावी

आधुनिक केसरी

**राजरत्न भोजने**

सध्या प्रत्येक व्यक्तीसाठी आरोग्य विमा अत्यंत महत्त्वाचा आहे. वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च आणि चांगल्या आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे आपण सर्वजण चांगल्या वैद्यकीय संस्थांची निवड करतो आणि त्यांच्या किमती खूप जास्त आहेत. म्हणूनच आरोग्य विमा आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचा आहे. योग्य आरोग्य विम्याशिवाय, चांगल्या आरोग्य सुविधांसाठी आपल्याला खूप जास्त किंमत मोजावी लागते आणि अनेक वेळा या समस्यांमुळे आपल्याला आर्थिक अडचणीतही येते. कोणतीही आरोग्य विमा योजना निवडण्यापूर्वी, त्याची इतर योजनांशी तुलना करणे फार महत्वाचे आहे. अशा प्रकारे तुम्ही तुमच्या बजेट आणि गरजेनुसार योग्य योजना निवडू शकता. सध्या बाजारात अनेक आरोग्य विमा योजना उपलब्ध आहेत आणि प्रत्येक योजनेचे स्वतःचे गुण, मर्यादा आणि किंमत आहे.अशा प्रकारे, अनेक योजनांची एकमेकांशी तुलना करून, तुम्ही स्वतःसाठी योग्य आरोग्य विमा योजना निवडू शकता. तुमच्यासाठी योग्य योजना निवडताना, तुम्हाला खाली नमूद केलेल्या पॅरामीटर्सचा विचार करणे आवश्यक आहे.

**हॉस्पिटलच्या खोलीचे भाडे :** कोणत्याही रुग्णालयात दाखल करताना खोलीची



निवड हा महत्त्वाचा घटक असतो . बऱ्याच आरोग्य विमा पॉलिसींमध्ये यासाठी एक निश्चित रक्कम असते, जसे की प्रतिदिन रु 5000 किंवा विम्याच्या 1% किंवा यापैकी जे कमी असेल . त्यामुळे त्याच वेळी, काही पॉलिसी कोणत्याही कॅपशिवाय रूम कव्हरेज देतात, जरी या प्रकरणात प्रीमियम बदलू शकतो . त्यामुळे अनेक पॉलिसींची तुलना करणे फार महत्वाचे आहे .

**पॉलिसी घेण्यापूर्वी कव्हरेज काय :** कोणतीही वैद्यकीय विमा पॉलिसी घेण्यापूर्वी, ती काय आणि किती कव्हरेज देते हे जाणून घेणे फार महत्वाचे आहे . कारण लोकांच्या गरजा आणि गरजांनुसार ते वेगळे असू शकते . कौटुंबिक आरोग्य विमा घेताना, कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या गरजा त्या पॉलिसीमध्ये पूर्ण केल्या जातात हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे . कव्हरेजची तुलना करताना विचारात घेण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत, जसे की रुग्णवाहिका कव्हरेज, होम केअर उपचार, आयुष कव्हर इ . यानंतर, तुम्ही तुमच्यासाठी योग्य पॉलिसी निवडू शकता .

**आरोग्य विमा योजनांचा प्रतीक्षा कालावधी :**
वेगवेगळ्या आरोग्य विमा योजनांचा प्रतीक्षा कालावधी वेगवेगळा असतो . जसे की आधीच अस्तित्वात असलेले रोग (PEDs), किंवा पॉलिसी दस्तऐवजात नमूद केलेले कोणतेही रोग, मातृत्व इ . हे सर्व प्रतीक्षा कालावधी प्रत्येक पॉलिसीसाठी भिन्न आहेत . उदाहरणार्थ, काही कौटुंबिक आरोग्य विमा पॉलिसींमध्ये मातृत्वासाठी 12 महिने प्रतीक्षा कालावधी असतो, तर काहींमध्ये 24 महिने असतो . काही पॉलिसी लहान अतिरिक्त प्रीमियम भरल्यानंतर PED प्रतीक्षा कालावधी कमी करतात . म्हणूनच योग्य आरोग्य विमा योजना निवडताना प्रतीक्षा कालावधी समजून घेणे खूप महत्वाचे आहे .

**नेटवर्क हॉस्पिटल :** आरोग्य विमा कंपन्यांचे सहसा अनेक हॉस्पिटल ग्रुप्सशी टाय-अप असतात . या टाय अप्सना नेटवर्क हॉस्पिटल्स म्हणतात . तुम्ही नेटवर्क हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यास तुम्ही कॅशलेस उपचाराच्या सुविधेचाही लाभ घेऊ शकता . अशा प्रकारे तुम्ही तुमच्या खिशातून एक रुपयाही खर्च न करता संपूर्ण उपचार घेऊ शकता . अशा प्रकारे विमा कंपन्या थेट हॉस्पिटलमधून क्लेम निकाली काढतात . मात्र, ही सुविधा फक्त नेटवर्क रुग्णालयांसाठी उपलब्ध आहे . अशा परिस्थितीत, आपण अशी कंपनी निवडावी ज्या अंतर्गत अनेक नेटवर्क रुग्णालये आहेत .

## महिला आयोगाची दखल

आधुनिक केसरी

काँग्रेस नेत्या तथा आसाम युवक काँग्रेस अध्यक्षा डॉ. अंकिता दत्ता यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास बी.व्ही व युवक काँग्रेसचे सचिव वर्धन यादव यांच्यावर छळाचे गंभीर आरोप केले होते. तसेच याबाबत वरिष्ठांकडे तक्रार करूनही यावर अद्याप साधी चौकशी समितीही नेमण्यात आलेली नाही, असंही त्या म्हणाल्या होत्या. दरम्यान, या प्रकरणाची दखल आता राष्ट्रीय महिला आयोगाने घेतली आहे. महिला आयोगाने आसामाच्या पोलीस महासंचालकांना पत्र लिहित अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. एक निवेदन जारी करत महिला आयोगाने याबाबत माहिती दिली. डॉ. अंकिता दत्ता यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्ष बी.व्ही श्रीनिवास यांच्या विरोधात छळाचे गंभीर आरोप केले आहेत. डॉ. अंकिता दत्ता यांनी याबाबत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांना माहिती दिली होती. मात्र, त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा यांनी आसामच्या पोलीस महासंचालकांना पत्र लिहित या घटनेची सखोल निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. तसेच याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती महिला आयोगाने जारी केलेल्या निवेदनातून देण्यात आली आहे. तसेच याबाबत महिला आयोगदेखील चौकशी करणार असल्याचं या निवेदनातून सांगण्यात आलं आहे. आसाम युवक काँग्रेस अध्यक्षा डॉ. अंकिता दत्ता यांनी बुधवारी ट्वीट करत युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास व्ही. बी. व युवक काँग्रेसचे सचिव वर्धन यादव यांच्यावर छळाचे गंभीर आरोप केले होते. मागील सहा महिन्यांपासून युवक काँग्रेस अध्यक्ष श्रीनिवास बी. व्ही. आणि सचिव वर्धन यादव माझा छळ करत आहेत. वर्धन यादव यांना महिलेचा सन्मान कसा करायचा हे माहिती नाही. ते मला 'ये लडकी' असे म्हणत बोलावतात. ते मला डॉ. अंकिता दत्ता किंवा आसाम युवक काँग्रेसची अध्यक्ष म्हणून संबोधत नाहीत. असे त्यांनी ट्वीटमध्ये म्हटले होते. तसेच मी याबाबत वरिष्ठ नेतृत्वाकडे याबाबत तक्रार केली. मात्र, अद्यापही यावर चौकशी समिती नेमण्यात आली नाही. अस आरोपही त्यांनी केला होता.

## भारत देशाने बेकारी दूर करण्याचा उच्चांक गाठावा



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारताने सर्वाधिक लोकसंख्येमध्ये चीनला मागे टाकले आहे. भारताच्या वाढत्या लोकसंख्येमुळे लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारची गरज वाढणार आहे.लोकसंख्या वाढीचा ही आकडेवारी जाहीर करताना संयुक्त राष्ट्राने म्हटले की, भारताने चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. ब्लूमबर्गने संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक लोकसंख्या डॅशबोर्डचा हवाला देत म्हटले आहे की भारताची लोकसंख्या १.४२८ अब्ज (१४२.८६ कोटी) पेक्षा जास्त आहे. तर चीनची लोकसंख्या १.४२५ अब्ज (१४२.५७ कोटी) आहे. दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये थोडाफार फरक आहे.**

मात्र, भारत आणि चीनच्या लोकसंख्येच्या आकडेवारीच्या संकलनात थोडा फरक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. चीनची लोकसंख्या गेल्या वर्षी शिखरावर होती आणि आता खाली येत आहे, तर भारताची लोकसंख्या वाढत आहे.UNFPA च्या अहवालानुसार भारतातील २५ टक्के लोकसंख्या ०-१४ वयोगटातील आहे. तर १० ते १९ वयोगटातील १८ टक्के आणि १० ते २४ वयोगटातील २६ टक्के लोकसंख्या आहे. तर, ६८ टक्के १५ ते ६४ वयोगटातील आहेत. याशिवाय ७ टक्के लोक ६५ वर्षांवरील वयोगटातील आहेत. विविध संस्थांच्या अंदाजानुसार भारताची लोकसंख्या जवळपास तीन दशके वाढतच जाणार आहे. अहवालात म्हटले आहे की फेब्रुवारी २०२३पर्यंतच्या आकडेवारीनुसार, ३४० दशलक्ष लोकसंख्येसह अमेरिका भारत आणि चीननंतर तिसऱ्या क्रमांकावर आहे. ८.०४५ अब्ज अंदाजित जागतिक लोकसंख्येपैकी भारत आणि चीनचा वाटा एक तृतीयांशपेक्षा जास्त आहे.

नरेंद्र मोदींच्या सरकारसाठी आता मोठी परीक्षा ठरणार आहे. लाखो लोकांना रोजगार देण्याची गरज आहे. भारतातील निम्मी लोकसंख्या ३० वर्षांपेक्षा कमी वयाची आहे. भारतात बेकरीचा प्रश्न अतिशय गहाण व तितकाच गंभीर आहे.देशातील तरुणांना रोजगार देण्यात व गरीबी व बेकारी कमी करण्यात आता पर्यन्त सरकरला यश आले नाही.वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत भारतात रोजगार नाही.तरुणांच्या हाताला काम नाही.भारत हा तरुणांचा देश आहे. संपूर्ण जगाला रोजगार देण्याची क्षमता भरताजवळ आहे. येथील उच्च शिक्षित तरुण विदेशात जावून रोजगारव नोकरी करत आहे.मात्र आमचे मायबाप सरकार तरुणांना रोजगार देण्यात कमी पडत आहे. येत्या काही वर्षांत भारताची भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनणार आहे.या पार्श्व वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्याच्या दृष्टीने युवकांना रोजगार देणे. व त्यांना व्यावसायिक बनविणे तितकेच आवश्यक आहे.

निसर्ग आणि लोकसंख्या यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. नैसर्गिक क्षमता आणि पुरवठा यांच्यात व्यस्त प्रमाण दिसू लागले की, बेकारीसारख्या अनेक समस्या डोके वर काढू लागतात. हा संदर्भ लोकसंख्या आणि संसाधनांशी संबंधित असला तरी त्याचे रहस्य रोजगार आणि सुशासन यांच्याशीदेखील संबंधित आहे. रोजगार तयार केले जातात आणि त्यांना संधी समतुल्य केले जाते, तर अशा संधी देऊन सुशासन करण्याच्या बाजूने प्रशासन असते, हे स्पष्ट आहे. सध्या जगभरातील नवीन तंत्रज्ञानामुळे आणि कोरोना महामारीच्या प्रकोपामुळे बरेच व्यवसाय आपले अस्तित्व गमावत असल्याचे चित्र भारतासह जगभरात दिसून येते आणि ते एक आव्हान बनले आहेत. बेकारीचा थेट परिणाम चांगल्या नागरिकाच्या निर्मितीवर होतो. सर्व प्रयत्न करूनही रोजगार आघाडीवर जगण्याची कसोटी सरकारांसमोर राहिली आहे. सर्वेक्षणातून असे दिसून आले आहे की सुशिक्षित तरुणांमधील बेरोजगारी अत्यंत निकृष्ट स्थितीत गेली आहे.



जानेवारी २०२१ मध्ये 'एनएसएसओ'ने बेरोजगारीबाबतचा अहवाल जाहीर केला आहे. तेव्हा हा दर साडेचार दशकांमध्ये भारतात सर्वाधिक असल्याचे नमूद केले. तेव्हा सरकारकडूनही त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी'ने (सीएमआयई) २०२० साली जारी केलेल्या अहवालानुसार बेरोजगारीचा दर ७.७८ टक्क्यांपर्यंत वाढला होता. कोरोनाच्या पूर्ण काळात बेरोजगारीचा दर २४.२ टक्क्यांवर पोहोचला.कोरोना कालावधीत ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, जपान, हाँगकाँग, व्हिएतनाम आणि मलेशियासह अनेक देशांमध्ये युवा बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक होते. निश्चितच बेरोजगारीची भरभराट सध्या जोरात सुरू आहे. परंतु, सर्व काही अधिक चांगले करण्यासाठी सरकारकडून प्रयत्नही केले जात आहेत. दि. १ फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात सूक्ष्म, लघु आणि मध्यम (एमएसएमई), उत्पादन क्षेत्र आणि 'मेक इन इंडिया'ला प्रोत्साहन देऊन रोजगार आणि अर्थव्यवस्था दोन्ही मजबूत करण्याचा प्रयत्न याक्षणी दिसून येत आहे.

२०२५ पर्यंत उत्पादन क्षेत्राचे योगदान २५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येईल. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भारत चीन आणि तैवानसारख्या उत्पादन केंद्रांचेही अनुसरण करीत आहे. असे केल्याने आयात कमी होईल, तांत्रिक तळ विकसित होतील आणि रोजगार वाढतील. तथापि, 'स्ट्रक्चरल अडचणी', 'जटिल कामगार कायदे' आणि एक नोकरशाहीचा अरुंद दृष्टिकोन आदींमुळे या कार्यक्रमास येणाऱ्या बाधा कमी नाहीत. जागतिक बँकेच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास हे स्पष्ट होते की, बऱ्याच वर्षांपासून भारतातील अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन क्षेत्रातील योगदानामध्ये फारसा बदल झाला नाही. याउलट चीन, कोरिया आणि जपानसारख्या इतर आशियाई देशांमध्ये परिस्थिती बरीच बदलली आहे आणि उत्पादन वेगवेगळी रूप धारण करीत आहे. देश तरुणांचा आहे आणि रोजगारावर तुलनात्मक सक्रियता आहे. परंतु, कौशल्य विकास नसल्यामुळे बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे.

भारतात २५ हजार कौशल्य विकास केंद्रे आहेत. चीनमध्ये अशा केंद्रांची संख्या सुमारे पाच लाख असून दक्षिण कोरियासारख्या छोट्या देशात एक लाख आहे. सुशासनाचे वारे कसे वाहतात आणि आयुष्य कसे चांगले आहे, हा लाखोंचा प्रश्न आहे. देशातील ५० टक्के लोक शेतीशी निगडित आहेत. प्रत्येकाला माहीत आहे की, येथेही उत्पन्नाचे नुकसान आणि मर्यादित रोजगारामुळे हा अस्तित्वाचा धोका आहे. सर्वसमावेशक विकासासाठी आठव्या पंचवार्षिक योजना पुढे सरसावत असताना दहाव्या पंचवार्षिक योजनेत सरकारी नोकऱ्यांची कपात करण्याची प्रक्रिया पाहिली जाऊ शकते.

यावर उपाय म्हणून आर्थिक सुशासनदेखील आवश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघ सुशासन हे सहस्राब्दी विकास उद्दिष्टांचे एक अत्यावश्यक घटक मानते. कारण, सुशासन, दारिद्य्र, असमानता आणि मानव जातीच्या अनेक अपूर्णतेविरुद्ध लढा देण्याचे मैदान तयार करते, अर्थातच त्यातील पायाभूत सुविधा केवळ तरूणांच्या हातात जेव्हा काम असेल तेव्हाच मजबूत आणि बळकट होतील. रोजगार उपलब्ध आहेत. परंतु, कुशल लोकांची कमतरता आहे. त्यामुळे मानवी श्रम कार्यक्षम करण्यासाठी नवीन केंद्रे सुरू करावी लागतील आणि हाच बेकारी दूर करण्याचा एक सर्वोत्तम मार्ग असणार आहे.

## लोकसंख्या शिक्षण काळाची



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**गरज जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात भारताने चीनला मागे सारून अव्वल स्थान प्राप्त केले आहे. या वर्षीच्या सुरवातीलाच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. आता युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार आता भारताची लोकसंख्या चिनपेक्षा वीस लाखांनी जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे.**

भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या



नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पुण्यातील पुरस्कार वितरणात आधुनिक केसरीचा डंका

## संजय व्यापारी,उज्ज्वला धर्माधिकारी, चंद्रहास शास्त्री व प्रतिमा काळे यांना पुरस्कार



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** समाज प्रबोधन ट्रस्ट व वुमन्स लिबर्टी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजकार्याबद्दल राज्यस्तरीय कृतज्ञता सन्मान पुरस्कार 2023 चे वितरण काल पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पुणे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष व रांका ज्वेलर्सचे सर्वेसर्वा फत्तेचंद राका हे होते तर महिला गृहऊद्योग लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कोते प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थीत होते, या पुरस्कारांमध्ये आधुनिक केसरीने चांगलीच बाजी मारली व आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, आध्यात्मिक लेखन करणारे चंद्रहास शास्त्री, उज्ज्वला धर्माधिकारी तसेच लेखिका कवियत्री प्रतिमा काळे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आज पुण्यात बालगंधर्व रंगमंदिरात लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सुरेश कोते यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.


गेल्या 35 वर्षापासून दैनिकात काम करणारे आर्टिस्ट, लेखक, कवी असे विविध कला अवगत असलेले आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी यांना त्यांच्या पत्रकारितेतील उत्कृष्ट कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी आधुनिक केसरीच्या माध्यमातून नवोदित साहीत्यीकांसाठी एक व्यासपीठ तयार केले आहे. व त्यातून अनेक नवोदीत लेखक, कवींना प्रसिद्धी मिळत आहे. महिलांचा सन्मान हा प्रत्येकाने केला पाहिजे हा आपणा सर्वांचा धर्म आहे, प्रत्येकाच्या जीवनात स्त्रीचा महत्वाचा रोल आहे मग ती आई असो बायको असेल किंवा बहीण, मूलगी असेल त्या सर्व घर गृहस्ती सांभाळतात, नौकरी करून घर सांभाळणे हे आव्हान त्याच पेलू शकतात असे अध्यक्षीय मनोगत मांडताना फत्तेचंद रांका यांनी सांगीतले, जगातील सर्वात मोठी महिला संस्था म्हणून महिला गृहउद्योग लिज्जत पापडचे नाव घेतले जाते त्याचे सर्वेसर्वा सुरेश कोते यांनी महिला शक्ती काय करू शकते हे त्यांच्या कार्यातून समजावून सांगितले, आमच्याकडे काम करणा-या सर्व महिला नौकर नसून मालक आहेत. संस्थेतील प्रत्येक निर्णयात त्या सहभागी होऊ शकतात असे त्यांनी सांगीतले.

याप्रसंगी जयंत हिरे यांच्या महिलांच्या यशोगाथा या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे अनावरण फत्तेचंद रांका यांच्याहस्ते करण्यात आले. या पुस्तकात महाराष्ट्रातील आघाडीच्या महिलांच्या यशोगाथा प्रकाशित होणार आहेत असे जयंत हायर यांनी त्यांच्या मनोगतात सांगीतले.

या कार्यकमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थीत होते.

# सुवर्णा पवार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर काव्य गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** सन २०२३चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर काव्य गौरव पुरस्कार सुवर्णा पवार , इचलकरंजी यांना त्यांच्या साहित्य क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे देण्यात आला. श्री क्षेत्र म्हाळुंगे ( पुणे ) येथे चित्रपट निर्माते, लेखक, कवी मा. डॉ. मधुकर घाणेकर व सुप्रसिध्द कवी मा. बाबा ठाकूर यांच्या हस्ते पुरस्कार, शाल, मानाचा फेटा, गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था , पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष विकास राऊत यांनी केले.

# बीआरएस आगामी सर्व निवडणुका लढविणार : संतोष माने

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबादः** गंगापूर- खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील आगामी सर्व निवडणुका ( बीआरएस ) भारत राष्ट्र समिती पक्ष सर्व ताकदीने लढविणार असून सर्वांना सोबत घेवून काम करणार असल्याची माहिती बीआरएस पक्षाचे नेते संतोष माने पाटील यांनी आज बुधवारी खुलताबाद शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. गंगापूर- खुलताबाद विधानसभा मतदारसंघाची निवडणुक राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून लढविलेले संतोष माने यांनी नुकताच तेलगंणाच्या भारत राष्ट्र समिती पक्षात प्रवेश केला असून आज बुधवारी त्यांच्या अनेक समर्थकांनी बीआरएसमध्ये प्रवेश केला यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत संतोष माने यांनी बीआरएस पक्षाने तेलगंणात केलेल्या लोककल्याणकारी योजना व विकास कामाची माहिती दिली. आगामी काळात बीआरएस पक्ष वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असून येत्या सर्व निवडणुका लढविल्या जाणार असल्याचे सांगितले. २०२४ मध्ये बीआरएस ला सोबत घेतल्याशिवाय कुणाचेच सरकार येणार नसल्याच सांगत पुढे म्हणाले की, येत्या २४ एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर मध्ये तेलगंणाचे बीआरएसचे मुख्यमंत्री केसीआर यांची जाहीर सभा असून यासभेसाठी गंगापूर- खुलताबाद तालुक्यातुन शेकडो कार्यकर्ते जाणार आहे.

# वडोद बाजार पोलीस ठाण्यातर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन

## उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज



**वडोदबाजार :** पवित्र रमजान महिन्यात अनुषंगाने वडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे यांच्याकडून इफ्तार पार्टी आयोजन बूधवारी सध्यांकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आली होती. इफ्तारपार्टीत सर्वधर्मीय नागरिक उपस्थित होते उपस्थिताना संबोधन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी जय दत्त भवर यांनी आगमी रमजान ईदच्या शुभेच्छा देत सदभावनेन व शांततेचे आवाहन करून ईद उत्साहात वं शांततेत सर्वांनी एकत्र साजरी करावी, असे आवाहन केले. सपोनी विलास मोरे यांनी सर्व धर्मसमभाव च्य भावनेने ईद सण साजरा करावी, असे आवाहन केले ठाण्याच्या खुल्या वातावरणात सर्वांनी इंफ्तार करत नमाज पठण केले याप्रसंगी वडोदबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आळंद .उमरावती . नायगव्हान पिरबवडा खांमगाव वडोद बाजार माहाळ किन्होळा ( फरशी ) पत्रकार विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व समाजबांधवांची उपस्थीती होती.

पाहिजे
शाळेसाठी अनुभवी शिक्षिका व लिपीक पाहिजे.
12 वी डि.एड.,बीएड.,एमएस्सी
शांताराई महाविद्यालय ताजनापूर ता. खुलताबाद
मो.8552971455

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna 8623904312
Abhijeet Shukla 9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO EPS-1995 Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र-पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड ( मोबाईल लिंक असणे गरजे ), ई-मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
कॉमन सर्व्हिस सेंटर
आपले सरकार सेवा केंद्र
बँक ऑफ महाराष्ट्र समोर, एन-7, सिडको.
मो. 9403345739

CAFE ROCKSTARZ EAT. CHILL. REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# माफीया अतिकची 'लंका' जळाली!



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**जो दुसऱ्याच्या खड्डा खोदतो,त्यालाही त्याच खड्यात जाण्याची वेळ येते!माफिया बंधू अतिक व अशरफ यांची तीन तरूणांनी गोळ्या झाडून हत्या केली! या गुंडाची हत्येवरुन विरोधी पक्षात दु:खवटा पसरला. देशात काँग्रेसची सत्ता मुंबईत चाळीस वर्षे गुंडाचे राज्य होते! अतिक व त्याचा भाऊ माफीया होते,ते थोर समाजसेवक,स्वातंत्र सैनिक अथवा राष्ट्रभक्त नेते नव्हते ? विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या डोळ्यात अश्रू येण्याचे कारण काय? कारण तर ते मुस्लिम होते!या निमित्ताने होईना! मुस्लिम व्होटबँक मजबूत करता येईल!म्हणून देशात व उत्तरप्रदेशात लोकशाही, कायदा, न्याय व्यवस्था राहिलेली नाही,देशात दहशत निर्माण केली जात आहे. अशीओरड विरोधी पक्षाकडून होत आहे.हे तर 'मेलेल्या माणसाच्या टाळूवरचे लोणी खाण्याचाच प्रकार आहे.**

उत्तर प्रदेशमधील दोघे बंधू माफीया अतिक व अशरफ हे सद्या पोलिस कस्टडीत होते. प्रयागराज येथे वैद्यकीय उपचारात असताना दि.१५ एप्रिल रोजी पत्रकाराच्या भूमिकेत आलेल्या तीन तरुणानी त्यांचेवर गोळ्यांचा तुफान मारा करत त्यांना ठार मारले.या गुंड व माफीया बंधूची मौत ही कुत्र्याप्रमाणे झाली. या घटनेचे समर्थन होऊ शकत नाही. उत्तर प्रदेश मुख्यमंत्री योगी सरकारने अश्या हत्याचे समर्थन केलेले नाही.यात विरोधी पक्षाने मागणी करण्यापूर्वी मुख्यमंत्री योगी सरकारने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अरविंदकुमार त्रिपाठी यांच्या अध्यक्षते-खाली निवृत्त न्यायाधीश ब्रिजेशकुमार सोनी आणि पोलिस महासंचालक सुबेशकुमार यांची त्रिसदस्यी न्यायिक आयोगाची नियुक्ती केली आहे.
प्राथमिकदृष्ट्या यात राज्य पोलिस यंत्रणेचा गाफीलपणा दिसून येतोय!पण घटना योगी सरकारने घडवून आणली,असा सूर विरोधी पक्षाकडून काढला जात आहे,हा तर अततायीपणा आहे.घटना घडताच निष्कर्ष काढणे व आरोप करणे,अज्ञानपणा आहे. केवळ लोकांची दिशाभूल करण्यासाठी बेताल आरोप केले जात आहेत.या घटनेबाबत किमान न्यायिक आयोगाच्या चौकशी अहवालाची प्रतीक्षा करावयाला हवी!घटनेच्या दिवशी पोलिसांनी पत्रकारांना अतिक व अशरफजवळ अगदी जवळ येऊ कसे दिले ? कारण त्यांच्या जीवाला कधी धोका आहे,हे माहित असताना चूक कशी काय झाली ? भारतीय घटनेला कोणाही हातात कायदा घेण्याचा अधिकार दिलेला नाही. पोलिसांनी न्यायालयात अतिक सुरक्षेबाबत हमी दिली,असताना त्यांच्या सुरक्षितेत ढील दिली गेली. त्यांना रात्रीच उपचारासाठी नेले जात होते!याची पत्रकारांना माहिती कशी कळाली ?तसेच तथाकथित तीन पत्रकार गुन्हेगारापर्यंत खात्रीपूर्वक माहिती मिळाली असणारच! तेंव्हा राज्य गुप्तचर विभागाला हे तीन तरुण पत्रकार आहेत की नाही ? याचा संशय आलेला नाही.या तरुणाच्या विदेशी तुर्कीच्या रिव्हाल्वर हाती, त्यांना कोणी व का दिली ?या तीन तरुणांनी हत्येचे नियोजन कोठे व कसे केले ?त्यांना गुन्हेगारी क्षेत्रात डॉन व्हायची इच्छा होती,म्हणून त्यांनी हत्या केली, जे सांगितले जात आहे! यात तथ्य वाटत नाही. या हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्यानंतर 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्या ? म्हणजे त्यांचा उद्देश दुसराच होता का ? त्यांनी नियोजन करून हत्या केली. शस्त्रे घेतली,त्यासाठी त्यांना पैसा कोणी पुरविला ?या तरुणांनी हत्याकांड धाडस केले! ते पळाले नाहीत! भित्रेही नव्हते! त्यांना हे कृत्य करण्याचे बळ कसे मिळाले ? यावरुन हत्यामागे मोठा मास्टरमाईंड असलाच पाहिजे. आता अतिकने एका चिठ्ठीत आपल्या हत्येबाबत नावे लिहिली आहेत, त्यात म्हणे! राजकीय नेते,व्यापारी नावे आहेत. असे वृत्त दिले जात आहे.पण अतिकला फारसे लिहिता येत नाही.चिठ्ठीवर त्याचे अक्षर नाही.त्याने पत्रे एकाद्या कायदे- तज्ज्ञांकडून लिहून घेतली असावीत.त्याला हत्येची माहिती व भीती होती.तर त्याने ती माहिती गुप्त का ठेवली ?त्याने ही माहिती स्थानिक न्यायालयात,पत्रकार,पोलिस दिली असती.हा बनवाबनवीचा प्रकार आहे!हत्येची घटना ४५ सेंकदात पूर्ण झाली. या घटनेत एक पत्रकार, पोलिस कर्मचारी जखमी झाला.यात थोडीशी जरी चूक झाली असती तर मोठी घटना घडली असती.हे हत्याकांड शनिवारी रात्री घडले आणि सोमवारी लगेच सर्वोच्च न्यायालयात याचिक दाखल केली गेली. एवढी तत्परता तर सामान्य माणसाबाबत दाखविली जात जाती नाही. अतिक व अशरफ हे दोघेच गुन्हे करत होते असे नाही. यात पत्नी, मुले, मेव्हणा, मेव्हणी, इतर नातेवाईक यांचेही भागीदार आहेत.या सर्वांवर पोलिस दफ्तरी विविध गुन्हे नोंदी आहेत. पण या अतिकला काँग्रेस व बसपा, स.पा.ने राजकारणात आणून नेता बनविले,राजकीय शिष्टाचाराचा दर्जा दिला व त्याचे कृत्याला संरक्षण देण्याचे काम केले. याच अतिक अहमद माफियाने अनेकांची घरे उध्वस्त,जमीनी घेतल्या, क्रूरपणे हत्या केल्या, तो खंडणी घेत होता.स्वतः च्या निवडणुकीसाठी व्यापारी बिल्डर्सकडून तो पैसा वसूल केला जात असे.तेंव्हा कुटुंबाची विरोधी पक्षाला कधी दया आलेली नाही. माफीया हे बंधू मुस्लिम असल्याचे मारले गेले,असा अप्रचार केला जात आहे.वास्तविक पहिला खून चांदबाबा केला गेला तो मुस्लिम होता.तसेच मदश्यातील मुलींचे अपहरण करून अत्याचार करण्यात आले होते.अतिकच्या विरोधात मुस्लिम समाजाच्या पन्नासच्या अधिक तक्रारी आहेत.त्याने जेंव्हा उमेशपालचे हत्याकांड घडविले तेंव्हा विरोधी पक्ष नेत्यांची दाखखिळी बसली होती काय ?देशात गुन्हेगार टोळीतील युध्द व संघर्ष हा काही नवा नाही,देशात अश्या अनेक घटना घडल्या आहेत. भारतात मुंबईत संघटीत गुन्हेगारीचा उदय झाला.१९४४ ते १९८० पर्यत हाजी मस्तान, वरदराजन,करीमलाला दाउद इब्राहीम,अरूण गवळी अश्या संघटीत गुन्हेगाराच्या टोळ्या होत्या. मुंबईत यांचे राज होते. बॉम्बे हे हिंसक शहर बनले होते. पोलिसांपेक्षा गुंडची शक्ती अधिक होती. ते बॉलीहूड चित्रपट निर्माते व दिग्ददर्शक, स्टुडिओ पैसा गुंतवणूक करून चित्रपट उद्योगावर दबदबा निर्माण केला होता. राजकीय नेते व चित्रपट कलावंत यांच्या दरबारात हजेरी लावत असत. अडरवर्ल्ड डॉन इब्राहिम याच्या गुन्हेगारी संघटनेत डी.कंपनीत २५ हजार कार्यकर्ते कामाला होते.



करीमलालाला श्रीमती इंदिरा गांधीभेट असत असे संजय राऊत यांनी पूर्वी एका मुलाखतीत म्हणाले होते! याचे त्यांना विमस्मरण झाले वाटत!काँग्रेसची सत्ता महाराष्ट्रात गुन्हेगारी टोळीने एकमेकांचे मुडदे पाडलेले आहेत, पोलिसांनीही एन्काउंटरमध्ये अनेकांना ठार मारले! तेंव्हा तर लोकशाही व कायद्याचे राज्य आहे! कायदा आपले काम करतो,यात राजकारण करू नये! असे उपदेशाचे सल्ले देत असत उत्तर प्रदेशमध्ये अतिक गुंड परिवाराचा खात्मा झाला, पण देशातील विरोधी पक्षांनी केवळ तुष्टीकरणाच्या राजकारणासाठी जे गुंड, अतिरेकी मुस्लिम म्हणून त्यांचे समर्थन बळ देण्याचे काम करत आहे. मुंबईत दाऊदच्या टोळीने शहरात रेल्वे,बस, अनेक महत्व पूर्ण इमारती बॉम्बस्फोट करुन हजारो जणाचा बळी घेतले आहेत. तेंव्हा देशात व राज्यात अराजकता निर्माण झाली नव्हती काय ? हे सर्व घटना गाफीलपणामुळे नाहीत काय ?. देशात सुभाषचंद्र बोस यांचे अपघाती मृत्यू,तत्कालिन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा संशयास्पद मृत्यू झालेला असताना शवविच्छेदन न करणे, या घटनेची चौकशी केली गेली नाही ?तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इदिरा गांधी यांच्या जीवाला धोका असताना सुरक्षा कर्मचाऱ्याची नियुक्ती कोणी केली होती ?.यातील दोन सुरक्षा कर्मचाऱ्यांना आत्मसर्मपण केले असता त्यात एकाला गार्डरूममध्ये जीवे का मारले गेले ? या चौकशीचे कोणत्या न्यायाधीशांनी व कशी करावयाची याचे याचे आदेश कोणी काढले होते ? या घटनेबाबत ठक्कर आयोगाचा अहवाल अजून पूर्णपणे प्रसिध्द नाही.श्रीमती इंदिरा गांधी यांचा पार्थिवदेह तीन दिवस ठेऊन शासकीय दुरदर्शनवर दाखविला गेला. तेंव्हा काँग्रेस नेत्यांनी तर 'खून का बदला खून से' घोषणा दिल्या. त्यानंतर दिल्लीत शीख हत्याकांड घडले. तेंव्हा पोलिसांची 'ना गोळी ना लाठी चालली. या गुन्ह्याची नोंद करण्यात आली नाही. तसेच तत्कालिन राजीव गांधी यांची जीवाला धोका होता, हे सुरक्षा यंत्रेणेने माहित होते तेंव्हा काय काळजी घेतली गेली नाही. राजीव गांधी यांचेसोबत नेहमी राहणाऱ्या सोनिया गांधी व काँग्रेस नेते त्यांचे सोबत घटनेच्या दिवशी सोबत का नव्हते ? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ज्या पक्षाच्या सरकारला तीन पंतप्रधान सुरक्षा करता का करता आलेली नाही,हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवारांनी सांगत नाहीत.पण जो सत्तेवरुन पाय तार झाल्यानंतर असत्य बडबड करतो!त्यावर पवार व सूपारी पत्रकार मत व्यक्त करत आहेत,याचे आश्चर्य वाटते.याच सूपारी पत्रकाराचा अंक भाजपा व्देषाने भरलेला होता. मुबंईत समुद्रमार्ग अतिरेकी येतात! हल्ला करतात, शेकडो जणांचे जीवे घेतात! तेव्हा राज्यात काँग्रेस सरकार होत ना! उत्तर प्रदेश २०१७ पूर्वी मुख्तार अन्सारी, अतिक अहमद या गुंडाचे राज होते. त्यांना जी जमीन, घर,जे पसंत पडले ते त्याचे मालकीचे झाले पाहिजेत! हे माजी पोलिस वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. त्यांची इतकी दहशत होती की, उत्तर प्रदेशमध्ये न्यायालयाच्या दहा न्यायधीशांनी अतिकच्या प्रकरणात जामीनाबाबत सुनावणी घेण्यास घेण्याचे टाळले, त्यानंतर अकाराव्या न्यायाधिशांने जामीन दिला. त्याचेवर शेकडो असताना चाळीस वर्षात काही प्रकरणाची सुनावणी अथवा शिक्षा का झाली नाही ? या कारणाची चौकशी झाली पाहिजे. बिहारमध्ये तर जंगलराज होते, खंडणी, अपहरण बलात्कार, हत्या रोज होत असत. पश्चिम बंगालमध्ये राजकीय गुंडगिरी व घरात बॉम्ब तयार केले जातात! पंजाबमध्ये राष्ट्रविरोधी खलिस्तान समर्थकांनी धुमाकूळ घातला आहे पुरोगामी महाराष्ट्र त्याच दिशेने जात आहे. सूपारी घेवून हत्या केल्या जात आहेत. महाविकास आघाडीचे सरकार असताना पत्रकाराच्या घरात घुसून अटक केली होती. पालघर येथे संताला सामुहिकपणे ठेचून मारले गेले! तेंव्हा पवारांना घटनेची आठवण झाली नाही. पण ते भाजपाशासित राज्य व योगी सरकारवर मात्र प्रश्न निर्माण करतात! काँग्रेस सत्तेत देशात व महाराष्ट्रातही गुंड माफीयात टोळी युध्द व असंख्य एनन्काउंटर झालेले आहेत! काही घटना पोलिस यंत्रणेच्या गाफीलपणामुळे झालेल्या आहेत.उत्तरप्रदेशच्या या हत्याकांडाबाबत आता राष्ट्रीय मानवाधिकार आयोग धावून आला आहे. त्यानी राज्याची पोलिस महासंचालक, प्रयागराज आयुक्त यांना नोटीस बजावली आहे. या आयोगाने माफिया विरोधात चाळीस वर्षात किती नोटीसा दिल्या ? उत्तर प्रदेश राज्यात गुंड व गुन्हेगारी व माफिया राज संपुष्टात आणण्याची राजकीय इच्छा कोणत्याही पक्षाने दाखविली नाही.पण योगी सरकारने ती दाखविली आहे. विरोधी पक्ष कितीही उर बडवून राजकारण असता तर राज्यातील सामान्य माणूस मुख्यमंत्री योगी माफिया अतिक याची 'लंका' जाळली आहे. योगी सरकारवर मात्र खूष आहे.

# अगाध प्रभुत्व कोणत्या भाषांवर ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्रयत्नाने आणि चारित्र्याने माणूस स्वत:चा विकास स्वत:च करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते.**

सर मुहम्मद इक्बाल हे उर्दूचे व फार्सीचे एक थोर कवी व विचारवंत होते. "इक्‌बाल" हे त्यांचे कवितेतील टोपणनाव होय. त्यांचे पूर्वज काश्मीरी ब्राह्मण होते. इक्बाल यांचा जन्म दि.२२ फेब्रुवारी १८७३ रोजी सियालकोट येथे झाला. सिलायलकोट येथील मरे कॉलेजमध्ये त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले व लाहोर येथून त्यांनी तत्त्वज्ञानात एमएची पदवी घेतली. नंतर जर्मनीतील म्यूनिक येथे जाऊन त्यांनी तत्त्वज्ञानात डॉक्टरेट मिळविली. इंग्रजी, जर्मन, फार्सी आणि उर्दू या चार भाषांवर त्यांचे अगाध प्रभुत्व होते. सन १९०८ साली ते इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन स्वदेशी परतले. सुरुवातीस त्यांनी लाहोर कॉजेलातील प्राध्यापकाची नोकरी पत्करली. परंतु थोड्याच दिवसांत ती सोडून दिली व शेवटपर्यंत वकिलीचा व्यवसाय केला. लहानपणापासून ते कविता करीत होते. त्यांच्यावर सुरुवातीस सूफी विचारांचाही प्रभाव होता. "हिदायतु-उल् इस्लाम" या संस्थेच्या सभांमधूनही ते आपल्या कवितांचे वाचन करीत. आपली ओजस्वी आणि राष्ट्रीय कविता त्यांनी सुरुवातीच्या काळातच लिहिली ती अशी-

***"सारे जहाँसे अच्छा;***
***हिंदोस्ताँ हमारा"***
***हम बुलबुले है जिसकी;***
***यह गुलसिताँ हमारा!!"***

युरोपातील तीन वर्षांच्या वास्तव्याने त्यांचा आरंभीचा राष्ट्रीय दृष्टिकोन सर्वस्वी बदलला आणि ते पूर्ण इस्लामवादाकडे वळले. त्यावेळी तुर्कस्तानची स्थिती आणि सत्ता डळमळीत झालेली होती, इराणवर रशियाचा डोळा होता आणि उत्तर आफ्रिकेच्या ट्रिपोलीवरील मुसलमानी सत्ता संपुष्टात आली होती. इस्लामच्या या अवनतीच्या काळातच त्यांनी आपली प्रसिद्ध व हृदयस्पर्शी कविता लिहिली. सर्व इस्लामवादाचा गडद प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर असल्यामुळे ते नंतर उर्दूऐवजी फार्सीत लेखन करू लागले. फार्सीचा आश्रय घेतल्याने आपले लेखन व तत्त्वज्ञान यांचा प्रसार सर्व इस्लामी राष्ट्रांत होऊ शकेल, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या तात्त्विक विचारसरणीवर आंरी बेर्गसाँ आणि फ्रीड्रिख नीत्शे यांच्या विचारांचा पगडा होता. हे त्यांच्या असरारे खुदी आणि रूमूजे बे खुदी या दोन फार्सी खंडकाव्य- मस्नवींवरून स्पष्ट दिसते. या दोन्ही मस्नवींचा इंग्रजी अनुवाद केंब्रिजचे प्राध्यापक निकल्सन यांनी केला. इक्बाल यांना सन १९२२मध्ये "सर" हा किताबही या ग्रंथांमुळेच बहाल करण्यात आला. त्यांच्या लेखनाला जागतिक कीर्ती लाभली. दांतेकृत डिव्हाइन कॉमेडीच्या धर्तीवर त्यांच्या फार्सी काव्यांचे पयामे मशरिक आणि जावेदनामा हे संग्रह निघाले. सन १९३५पासून ते पुन्हा उर्दूत लेखन करू लागले. बाले जिब्रैल आणि जर्बे-कलीम हे दोन उर्दू काव्यसंग्रह त्यांनी आयुष्याच्या अखेरीअखेरीस लिहिले. त्यांच्या प्रगत विचारांचे दर्शन या संग्रहांतून घडते. त्यांच्या आरंभीच्या उर्दू कविता बाँगे दरा या संग्रहात आहेत. हैदराबाद, म्हैसूर, मद्रास व अलीगढ



येथे त्यांनी इंग्रजीत जी व्याख्याने केली, त्यांचा संग्रह लेक्चर्स ऑन द रिकन्स्ट्रक्शन ऑफ रिलिजस थॉट इन इस्लाम या नावाने प्रसिद्ध झाला. इस्लाम धर्मावरील त्यांचे महत्त्वाचे तात्त्विक विचार त्यात आलेले आहेत. त्यात त्यांनी आपले सूफीविरोधी आणि कर्मयोगाची शिकवण देणारे तत्त्वज्ञान मांडले आहे. "जगातील सर्व मुसलमानांनी संघटित व्हावे व कुराणप्रणीत आचरण ठेवावे. राष्ट्रीयतेची भावना इस्लामला मारक आहे. पाश्चत्त्य संस्कृती निसर्गरहस्ये उलगडण्याची धडपड करीत असली, तरी तिला परमेश्वरी निष्ठेचे अधिष्ठान नाही. लोकसत्ताक पद्धती निरर्थक आहे, कारण तीत केवळ माणसे मोजली जातात, त्यांचे मूल्यामापन होत नाही." अशी मते त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादिली आहेत. "सारे जहाँसे अच्छा" यासारख्या ओळी सुरुवातीस लिहिणारे इक्बाल आता अशा ओळी कोरू लागले-

***"चिनो अरब हमारा,***
***हिंदोसिताँ हमारा!***
***मुस्लीम हैं हम, वतन हैं***
***सारा जहाँ हमारा!!"***

सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले आणि त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्रयत्नाने आणि चारित्र्याने माणूस स्वतःचा विकास स्वतःच करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या काव्याला उर्दू फार्सीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांचे दुःखद निधन दि.२१ एप्रिल १९३८ रोजी झाले.

!! स्मृतिदिनी सर मुहम्मद इक्बाल यांना व त्यांच्या अचाट काव्यशैलीला मानाचा सॅल्युट !!

# चळवळीमध्ये स्वार्थ बघणारे आंबेडकरवादी कसे ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**आंबेडकरवाद हा जगाला मार्गदर्शक आहे. जेथे प्रामाणिकपणा शिल्लक असून मेंदूचा वापर केला जातो त्या त्या ठिकाणी आंबेडकरवाद हा चिरकाल राहणार यामध्ये कुठेही थोडीही शंका नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे मानव जातीच्या उत्थानासाठी आहे. समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य बहाल करून हक्क अधिकार देऊन मानसिक गुलाम असलेल्या व हजारो वर्षापासून विकासापासून दूर ठेवलेल्या लोकांना मानसात आणून विकासाचे कवाडे बाबासाहेबांनी शिक्षणरूपी प्रकाशाने उघडून दिली. आणि म्हणून समाजाचा सर्वांगीण विकास व मानवाला माणसाचे स्वरूप मिळायला सुरुवात झाली. शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी मिळाली नोकरीच्या माध्यमातून मानसन्मान मिळाला, आणि हे सर्व मिळत असताना मोह माया मध्ये एवढे अडकून गेलो.**

बाबासाहेबांनी समाजासाठी निस्वार्थ भूमिकेतून कुठेही कोणाशीही संगनमत न करता, विचार व तत्वाशी तडजोड न करता, व स्वतःचा कोणताही वैयक्तिक फायदा न बघता, कधीही कोणासोबत हात मिळवणी केली नाही. परंतु बाबासाहेबांचे हे विचार आम्हाला आठवलेच नाही. ही मात्र शोकांतिका बाबासाहेबांच्या मेहरबानीने अनेक लोकांनी संसार थाटले.अनेक लोकांच्या जीवनात आनंद आला. बाबासाहेबांमुळे निर्माण झालेल्या आनंदाला आदर्श बनवण्याच्या नादामध्ये लाचार व बिकाऊ बनवले हे सत्य आजही आहे. बाबासाहेब आंबेडकरांमुळे अनेक लोक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये संधी मिळाल्याने मोठ मोठ्या पदांवरती विराजमान झाले. बाबासाहेबांमुळे शिक्षणाच्या माध्यमातून काही लोक गाढे अभ्यासक झाले. परंतु अभ्यासाचा फायदा समाजाला फुकटात कधी या लोकांनी होऊ दिला नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व कार्य लोकहितासाठी, स्वहीत न बघता फुकट केले. तरीही त्यांच्या नावावरती पोट भरणारे अनेक लोक निर्माण झाले. कोणी राजकीय स्वार्थ बघुन कोणत्याही विचारधारेच्या पक्षाला हातमिळवणी करून मिळेल तेवढ्यावर समाधान माणतात. तर दुसरी कडे चळवळ व विचार सांगण्यासाठी स्वतः चा लिलाव करतात. दोन्ही ठिकाणी स्वाभिमान विकुन लाचारीच पत्करली जाते. आणि तेच लोक स्वतःला चळवळीची शिलेदार समजून स्वतःच स्वतःची वाहवा करून घेत आहेत. बाबासाहेबांनी एकही क्षण वैयक्तिक हितासाठी भौतिक सुखासाठी जगला नाही. म्हणून अनेक लोक बाबासाहेबांमुळे यशवंत झाले. यशवंत झालेल्या लोकांनी मात्र चळवळीमध्ये किंवा समाजामध्ये शिक्षण,आरोग्य व कला या क्षेत्रात नवीन तरुणांना समोर येण्यासाठी व समाजाचे कल्याण होण्याकरिता हातभार लावण्यासाठी योगदान दिल्याचे दिसत नाही. बाबासाहेबांची चळवळ समता बंधुता न्याय यावर आधारित असून सर्वांना एका रांगेमध्ये उभे करून भारतीय म्हणून ओळख निर्माण करून देणारी आहे. परंतु या चळवळीला सुद्धा आग लावणारे लोक निर्माण झाले. बाबासाहेबांच्या न्याय हक्कामुळे अनेक लोकांच्या जीवनातील अंधार दूर झाला परंतु अजूनही काही लोक स्वार्थासाठी स्वतःला अंधारातच दाबून ठेवत आहेत. जीवन जगताना माणसाला शिक्षण तर आवश्यक आहेच परंतु शिक्षित झाल्यानंतर संघटन सुद्धा आवश्यक आहे. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी संघटित होण्याचा सल्ला दिला. परंतु अजूनही अनेक बेशरम माणसे संघटनेच्या नावाखाली पैसा वसुल करुन, फुट पाडून, बेकी निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीमुळे समतेचा शितल प्रकाश जरी येथे पडला असला, तरीही चळवळीमध्ये शितलता नाही. हे ही तेवढेच खरे आहे. विचाराची बाग निर्माण करून वैचारिक माळ्यांनीच बागेचा लिलाव करायला सुरुवात केल्याने चळवळीला व्यवसायाचे स्वरूप निर्माण झाले. पंचशीला बोलण्याचेही हजारो लाखो रुपये मोजावे लागतात. बाबासाहेबांनी स्त्री-पुरुष कोणत्याही भेद न करता सर्वांना मानव म्हणून ओळख निर्माण करून दिली तरीही लोक जाती धर्माला चिटकून स्वार्थासाठीच भारती बनतात. परंतु बाबासाहेबांची चळवळ व विचार समाजामध्ये रुजवण्याचे काम लोकशाहीर महाकवी वामनदादा कर्डक यांनी केले. एकाही रुपयाची अपेक्षा न ठेवता स्वतःचा आवाज कधी कोणाला न विकता, स्वतःचा लिलाव न करता, वामनदादांनी बाबासाहेब पोहोचवण्याचे काम केले. त्याच वामनदादाचे नाव घेऊन लाखो रुपयांचे सुपारी घेतली जाते व स्वतः च स्वतः ला शाहीर म्हणून प्रसिद्धी मिळवली जाते. थोडक्यात काय चळवळ ही निस्वार्थपणे करायची असते. चळवळीच्या माध्यमातून सामाजिक समता, सामाजिक न्याय या गोष्टी प्रस्थापित करून समाजावरील अन्याय दूर कसा होईल, किंवा समाजाला समस्येतून बाहेर कसे काढता येईल, यासाठी चळवळ असते. परंतु आज आपण चळवळीचा जर विचार केला तर चळवळ सांगण्यासाठी लोक स्वतःचाच लिलाव करून घेतात, व योग्य भाव न मिळाल्यास बाबासाहेबांचे विचार सांगण्यासाठी टाळाटाळ करतात. स्वतःला चांगला भाव मिळाला तरच ते बाबासाहेबांची चळवळ, बाबासाहेबांचे विचार हे फक्त स्टेजवरून सांगतात. स्टेजवरील कार्यक्रम संपला पैसे हातात आले की यांना लोकांना दोन शब्द प्रेमाचे बोलण्यासाठी



ही वेळ नसतो एवढे हे लोक व्यावसायिक होऊन चळवळीच्या नावाखाली स्वतःच लिलाव करण्यात व्यस्त झाले. स्टेजवरून लोकांना बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण करून दिलेला स्वाभिमान सांगतात, परंतु स्वतः चा स्वाभिमान पैसात बंद करतात. तर त्यांना विचाराचे कसे म्हणायचे ? चळवळ ही ऐशो आरामासाठी नसून, अस्तित्वासाठी असते. बाबासाहेबांची चळवळ तर त्याहूनही कठीण आहे. बाबासाहेबांचे विचार समाजामध्ये सांगून समाजाला निर्भीड, तर्कवादी, निर्व्यसनी बनवून, हक्क अधिकाराची जाणीव करून देऊन, समाजात जागृती करणे आवश्यक असते. आमचे जे काही अस्तित्व आहे ते बाबासाहेबांमुळेच आणि येणारे पिढीचे अस्तित्व कायम ठेवून त्यांच्या मनामध्ये स्वाभिमान जागृत करायचा असेल तर आंबेडकर चळवळ महत्त्वाची आहे. हे सांगण्यासाठी पैसाच घ्यावा लागतो जर पैसा नाही मिळाला तर चळवळ व विचार न सांगता घरामध्ये बसणारे लोक आंबेडकरवादी कसे असू शकतात? आंबेडकरवाद म्हणजे स्वार्थ,

... तर तो मानसन्मान आणि स्वाभिमान होय. पैसा बघून बोलणारे किंवा पैसा बघून विचार सांगणारे लोक स्वतःचा लिलाव करून स्वतःचे विचार व बुद्धी विकत असतात. आणि जो माणूस विकला जात असतो तो माणूस चळवळ चालू शकत नाही. आणि तो बिकाऊ चळवळ जरी चालवत असेल तरी तो खरा आंबेडकरवादी मात्र मुळीच होऊ शकत नाही. खरे चळवळ चालवणारी लोक व खरे आंबेडकरवादी असणारे लोक कोणत्याही लोभाची, पदाची, स्वार्थाची, अपेक्षा न करता होईल तेवढे बाबासाहेबांचे विचार पेरण्याचे काम करतात. आणि जे लोक बाबासाहेब आंबेडकर किंवा चळवळ यावर पैसा बघितल्याशिवाय तोंड उघडत नाहीत. अशा लोकांना चळवळीचे व बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेण्याचा कोणताही अधिकार नाही. बाबासाहेबांच्या नावाला भांडवल बनवून समाजाकडून पैसा उकळणारा माणूस आंबेडकरवादी नसू शकतो. बाबासाहेबांनी शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाचा फायदा समाजाला देण्यासाठी केला. परंतु आजची लोक जे काही करतात ते समाजाकडून घेण्यासाठी करतात. आणि म्हणून समाजातील सर्व सामान्य लोकांनी सुद्धा एक गोष्ट समजून घेणे आवश्यक आहे, ती म्हणजे चळवळीच्या नावाखाली किंवा बाबासाहेबांच्या अनुयायाच्या नावाखाली कोणतीही व्यक्ती कार्यक्रमाबद्दल हजारो, लाखो रुपयात स्वतःच लिलाव करून घेत असेल तर एक गोष्ट लक्षात घ्यावी, ती व्यक्ती आज बाबासाहेब सांगण्यासाठी स्वतःला विकू शकते. तर उद्या त्याहीपेक्षा जास्त जर पैसा मिळाला तर ती व्यक्ती शत्रूला जाऊन सुद्धा मिळू शकते. कारण त्या व्यक्तीला चळवळीतले विचार महत्त्वाचे नसून पैसा महत्त्वाचा आहे. म्हणून कमी पैसा जर मिळत असेल तर कार्यक्रम नाकारणारे आणि जास्त पैसा मिळाल्यानंतर कोणत्याही कार्यक्रमाला जाणारे लोक चळवळीसाठी व समाजासाठी घातक असतात. आणि यांना आंबेडकरवादी म्हणणे मुळातच चुकीचे आहे. बाबासाहेबांनी ठरवलं असतं तर स्वतःसाठी खूप काही कमावून ठेवले असते. परंतु त्यांनी स्वतः खर्च करून उभी केलेली शिक्षण संस्था सुद्धा लोकांच्या नावावर केली. स्वतःची पदर मोड करून वेळप्रसंगी स्वतः उपाशी राहून पैसे जमावून लोकांच्या भल्यासाठी खर्च करणारे बाबासाहेब जागतिक आदर्श होतात. परंतु शोकांतिका आहे की त्यांचेच नाव घेऊन स्वतःच्या स्वार्थासाठी स्वतःला विकून पैसा घेणारे बेगडी आंबेडकरवादी समाजामध्ये निर्माण झालेत. आणि हेच लोक समाजामध्ये विचाराची पेरणी न करता स्वतःचा लिलाव करून, लिलावाच्या स्पर्धेमध्ये टिकण्याचा निरागस प्रयत्न करत आहेत. फक्त पैशासाठी विचार सांगणारे लोक चळवळ, समाजासाठी घातक आहेत. म्हणून लोकांनी जागृत होऊन समाजामध्येच बोलणारा व प्रामाणिक कार्यकर्ता निर्माण करावा. तरच चळवळीला यश येईल व लिलाव करणाऱ्यांची दुकानदारी बंद होईल. तरच खऱ्या अर्थाने समाजामध्ये आंबेडकरवाद रूजायला सुरुवात होईल.

# 'पंडिता रमाबाई '!



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**गतशतकातील महान स्त्री व्यक्तिमत्त्वांचे स्मरण करताना, एक नाव आवर्जून घेतले जाते ते म्हणजे 'पंडिता रमाबाई '! स्त्रियांच्या उद्धारासाठी, प्रगतीसाठी त्या जन्मभर झटल्या. महाराष्ट्रात नऊवारी ऐवजी पाचवारी साडी नेसण्यास महिलांनी सुरुवात करण्यामागे पंडिता रमाबाई यांचे प्रयत्न होते. हा फक्त कपड्यापुरता मुद्दा नव्हता, तर स्त्री स्वातंत्र्य व स्वनिर्णयाचा हक्क हे मुद्दे महत्त्वाचे होते. याच पंडिता रमाबाई यांची 23 एप्रिल रोजी यंदा 165वी जयंती आहे. त्यानिमित्ताने त्यांची थोडक्यात माहिती देणारा हा लेख.**

परित्यक्त्या, विधवांच्या स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धाराकरिता समर्पित भावनेने कार्यरत राहिलेली महाराष्ट्रीय विदुषी. रमा डोंगरे, पंडिता रमाबाई सरस्वती, रमाबाई डोंगरे, मेधावी, मेरी रमाबाई , आयुष्यातील प्रत्येक नवीन टप्प्यात अशा नावाच्या स्थित्यंतरातून अतिशय खडतर आयुष्य जगलेल्या पंडिता रमाबाई ह्या सरस्वती बनल्या आणि स्त्री शिक्षणाच्या दीपस्तंभ ठरल्या. आपल्या सामाजिक कार्यात त्यांनी समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा यांविरूद्ध त्यांनी आवाज उठवला. कुमारी मातांसाठी मदत सहाय्यता केंद्र, गरीब मुलींसाठी शाळा असे अनेक उपक्रम राबवून त्यांनी स्त्री शिक्षणाची चळवळ पुढे चालू ठेवली.

रमाबाई यांचे वडील अनंतशास्त्री डोंगरे व आई अंबाबाई डोंगरे. म्हैसूर संस्थानातील माळहेरंजी जवळील गंगामूळ नावाच्या डोंगरावरील वस्तीत त्यांचा जन्म झाला. अनंतशास्त्री हे त्या काळी स्त्रियांच्या बाबतीत पुरोगामी विचारांचे होते. स्त्रियांना शिक्षण द्यावे, या मताचे ते होते. रमाबाईंस त्यांनी वेदादींचे शिक्षण दिले. त्या काळी लहानपणीच मुलींचे लग्न करून देण्याची पद्धत होती. त्यामुळे रमाबाई नऊ वर्षांच्या झाल्या, तरी त्यांचे लग्न करून दिले नाही म्हणून ज्ञातिबांधवांनी त्यांना वाळीत टाकले. आई वडिलांबरोबर केलेल्या तीर्थयात्रेच्या १५-१६ वर्षांच्या कालखंडात रमाबाईंना आई-वडिलांपासून, विशेषतः आईकडून, संस्कृत व्याकरण व साहित्याचे शिक्षण मिळाले. पण पुढे दुर्दैवाने १८७७ साली दुष्काळात रमाबाईंचे आई-वडील दोघेही निधन पावले.

रमाबाईंनी संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळविले होतेच; पण मराठी, हिंदी, बंगाली आणि कन्नड भाषाही त्या अस्खलितपणे बोलू शकत होत्या. त्याचबरोबर त्यांना गुजराती, तुळू व हिब्रू या भाषाही अवगत होत्या. १८७८ साली त्यांचे बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्यासह प्रवास करीत त्या कलकत्त्याला आल्या. तेथे मात्र त्यांच्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा उचित गौरव झाला. कलकत्त्याच्या सिनेट हॉलमध्ये त्यांना 'पंडिता' व 'सरस्वती' या बिरुदावली बहाल करण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. 'पंडिता' नावाने ओळखल्या जाणाऱ्या रमाबाई या एकमेव महिला होत. बंगाली स्त्रियांनीही त्यांना 'भारतवर्षीय स्त्रियांचे भूषण' म्हणून मानपत्र दिले.

रमाबाईंचा अशा रीतीने सर्वत्र सत्कार होत असतानाच त्यांच्या बंधूंचा १८८० मध्ये मृत्यू झाला आणि त्या एकाकी झाल्या; परंतु कलकत्त्यातील बिपिन बिहारीदास मेधावी या दुसऱ्या जातीतील पदवीधर व पुरोगामी विचारांच्या वकिलांनी मागणी घातल्यानंतर त्याच वर्षी त्यांच्याशी त्यांनी विवाह केला.



वैवाहिक जीवनही फार काळ त्यांना लाभू शकले नाही; कारण लग्नानंतर थोड्याच दिवसांत ( ४ फेब्रुवारी १८८२ ) अल्पशा आजाराने त्यांचे पती मरण पावले. वडील, आई, बहिण, भाऊ, पती यांच्या मृत्यूनंतरही त्या खचल्या नाहीत. ३१ मे १८८२ रोजी आपली एकुलती एक छोटी मुलगी मनोरमा हिला सोबत घेऊन त्या पुण्यास येऊन स्थायिक झाल्या व त्यांनी स्वतःला पूर्णतः समाज कार्याला वाहून घेतले.

बालविवाह, पुनर्विवाह, स्त्रियांवरील अन्याय, घातक चालीरीती व दुष्ट रूढी यांतून समाजास मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांनी १८८२ मध्ये प्रथम पुणे येथे व नंतर अहमदनगर, सोलापूर, ठाणे, मुंबई, पंढरपूर, बार्शी इत्यादी ठिकाणी 'आर्य महिला समाजा'ची स्थापना केली. याच वर्षी स्त्रीयांसंदर्भातील स्त्रीधर्मनीति नामक पुस्तक लिहिले.

त्या काळी बालविधवांना उपयुक्त होणारी 'बालोद्यान शिक्षणपद्धती' त्यांनी शिकून घेतली व त्यासंबंधी मराठी पुस्तके लिहिली. अमेरिकेतील आपल्या वास्तव्यात हिंदू बालविधवांच्या प्रश्नाचा ऊहापोह करणारे द हायकास्ट हिंदू वूमन ( १८८७-८८ ) हे इंग्रजी पुस्तक त्यांनी लिहिले. स्त्रियांच्या शोषणाच्या मुळाशी असलेल्या पुरुषप्रधान व्यवस्थेची कठोर चिकित्सा रमाबाईंनी त्यांच्या या पुस्तकात केली आहे. ११ मार्च १८८९ रोजी मुंबईला विधवांकरिता 'शारदा सदन' नावाची संस्था काढली. त्यांनी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाकरिता स्त्रीप्रतिनिधित्वाचा पुरस्कार केला.

केशवपनाविरुद्ध त्यांनी प्रचार केला व संमती वयाच्या चळवळीस पाठिंबाही दिला. दुसऱ्यांकरिता अविरत कष्ट करणाऱ्या या समाजसेविकेचे व्यक्तिगत जीवन मात्र फार दुःखी होते. त्यांच्या मुलीचेही २४ जुलै १९२१ रोजी मिरज येथे श्वासोच्छवास व हृदयविकाराच्या आजाराने निधन झाले. त्यानंतरही समाज कार्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले.

शेवटच्या काळात रमाबाईंनी केडगाव मिशनमध्ये अनाथ स्त्रियांसाठी नवे जग उभारण्याचा प्रयत्न केला; मात्र लवकरच केडगाव येथे रमाबाईंचेही निधन झाले.

आज या लेखाच्या निमित्ताने पंडिता रमाबाई यांना दिलेली ही भावपूर्ण आदरांजली!

# विविध प्रकल्पांचा मोठा खर्च दाखवून जनतेचा पैसा लाटला जातो

आधुनिक केसरी

सद्या आपल्या देशामध्ये टाकाऊ पासून टिकावू धोरण अवलंबून अनेक वस्तूंची निर्मिती केली जात आहे ते आपल्या फायद्याचे ठरतांना दिसून येत आहे याचाच एक भाग म्हणून कचऱ्यापासून वीजनिर्मिती,सीएनजी प्रकल्प तसेच खड्डे बुजविण्यासाठी प्लॅस्टिकचा वापर करुन ग्रामीण भागासह शहरे स्वच्छतेतून समृद्धीकडे जाताना पाहायला मिळत आहे दुर्गंधी, कचऱ्यापासून अनेकांना मुक्ती मिळून ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खर्चात देखील मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे असे असताना मात्र विविध प्रकल्प उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात निधी शासन मान्यतेने मंजूर केला जातो याचे कारण काय ? असा सर्वसामान्यांना प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही एकतर असे मोठंमोठे प्रकल्प निर्मितीसाठी ठेकेदार नेमावे लागतात मग यामध्ये आपल्या मर्जितल्या व्यक्तींची किंवा नातेवाईकांची निवड केली जाते जेणेकरुन या कामातील कारनामे कुणालाही समजणार नाहीत याची पूर्णपणे दक्षता घेतलेली असते ज्या विभागात तो प्रकल्प उभारणेत येणारं त्या विभागातील नगरसेवक, नगरपालिका, महानगरपालिका, इंजिनियर,मुख्य लेखाधिकारी, मुख्याधिकारी, आमदार या सर्वांना कामातील टक्केवारी ठेकेदाराला पोहोचं करावी लागते त्याशिवाय ठेकेदाराला कामाचे पैसे दिले जात नाहीत अथवा जो ठेकेदार कमिशन देत नाहीत त्यांना असले प्रकल्प देत नाहित हे वास्तव असून तसे जनतेतून बोलले जाते जनतेच्या कररुपी पैशातून अनेक विकासात्मक कार्यांना हातभार लागतो मात्र राजकारण्यांनी असा जनतेचा पैसा वारेमाप खर्च दाखवून लाटला जातो याला वाचा फोडण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका निश्चितच महत्वाची ठरते !!

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

# काटशेवरी फाटा येथे पणन संचालक कोकरे यांची भेट


आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील काटशेवरी रेणुका अभिनव महिला पणन सहकारी संस्थेस काटशेवरी फाटा येथे दिनांक 19/04/2023 बुधवार रोजी दुपारी 12.30 वाजता पणन संचालक श्री विनायक कोकरे यांनी संस्थेस भेट दिली असता संस्थेस, संस्थेचे स्वभाडवलावर संस्थेने स्वामालकीची गोडाऊन बांधकाम करुन, मालाची स्वच्छता व प्रतवारी, मशिनरी खरेदी करून, हजारो शेतकऱ्यांचा शेतमाल ग्राइंडिंग व प्रतवारी करून त्या मालाला योग्य तो बाजारभाव देऊन शेतकरी सभासदांसाठी खूप मोठे काम केले. या संस्थेच्या संकल्पनेतून एक मॉडेल अभिनव महिला पणन संस्था ,आज जिल्ह्यामध्ये सर्वसामान्य महिलांनी स्वतःचे भाग भांडवल जमा करून शासनाचे कोणतेही अर्थसहाय्य नसताना हे मोठे काम करून दाखविले. या संस्थेसाठी शासनाकडून काही योजना देण्याच्या नक्कीच आम्ही प्रयत्न करू, अशा संस्था ग्रामीण भागात गावोगावी स्थापन होऊन या संस्थेचा आदर्श इतर संस्थेने घेतला पाहिजे. त्यांनी रेणुका अभिनव महिला पण संस्थेस भीमथडी बचत गट महोत्सव यात्रेला भेट देण्यासाठी निमंत्रण दिले .एक चांगल्या संस्थेला आम्ही भेट दिली व नक्कीच आम्ही संस्थेला शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहू. यावेळी संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक डॉक्टर मुकेश बारहाते यांनी शासनाकडून जी काही या संस्थेला मदत करता येईल ती मदत केली जाईल. यावेळी खुलताबाद तालुक्याचे सहाय्यक निबंधक डॉक्टर आम्रपाली काशीकर मॅडम, यांनीही या संस्थेला नेहमी न्याय देण्याचे काम केलेले आहे व अनेक संस्थेच्या निवडणुका बिनविरोध करण्याचे कामही त्यांनी मोठ्या प्रमाणात केलेले आहे व त्यांच्या कामाची यावेळी प्रशंसा करण्यात आलेली आहे. तसेच सिल्लोडचे सहाय्यक निबंधक ज्ञानेश्वर मातेरे, खुलताबादच्या सहकार अधिकारी सुषमा साबळे, संस्थेच्या अध्यक्षा सविता आधाने पाटील, यांनीही या संस्थेच्या मालावर प्रक्रिया करून सदरची योजना राबवल्या जाईल असे यावेळी त्या म्हणाल्या व संस्थेचे मार्गदर्शक देविदास अधाने , बचत गटाच्या महिला यावेळी उपस्थित होत्या.



# कुटुंबवत्सल, नात्यांची घट्ट वीण दर्शवणारी 'असीमांतरेखा'

## डॉ. श्रीपाल सबनीस : महेश सावळे लिखित 'असीमांत रेखा' पुस्तकाचे प्रकाशन




आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** स्त्रीच्या शरीरापेक्षा तिच्या मनावर, त्यागावर प्रेम करायला हवे. भारतीय कुटुंबव्यवस्था कुटुंबवत्सल आणि नात्यांची गुंतागुंत असलेली आहे. या नात्याची घट्ट वीण आणि वात्सल्य दर्शवणारी 'असीमांत रेखा' मनाला भिडते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. वेदांत प्रकाशन प्रकाशित व महेश सावळे लिखित 'असीमांत रेखा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रसिद्ध लेखक श्रीकांत चौगुले, प्रकाशिका सुनिताराजे पवार, लेखक महेश सावळे, पत्नी रेखा, मुलगा अनुप, स्नुषा डॉ. पारुल आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, महात्मा गांधींजींचे सत्य, अहिंसा ही तत्वे सुखी संसाराची बीजे आहेत. प्रेम, विश्वासाने संसार अधिक फुलतो, बहरतो. सावळे दाम्पत्याने हेच सुत्र अवलंबल्याने त्यांच्या संसाराचा हा रथ अधिक जोमाने पुढे सरकत आहे. समर्पण, सहनशीलता, प्रेम अशा विविध पैलुंचे दर्शन या पुस्तकात घडते. स्त्री कर्तृत्वाचा आणि सांसारिक वाटचालीचा छत्तीस वर्षाचा हा प्रवास उत्तम पद्धतीने मांडला आहे. महेश सावळे म्हणाले, "समाजात व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आहेत. सांसारिक सहजीवनाची छत्तीस वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर पत्नीचा वेगळेपणा, तिची आपुलकी, तिचा प्रेमळ सहवास आणि तिच्या अस्तित्वाचा परिघ शब्दबद्ध करण्यासाठी, तसेच पत्नीच्या नात्याप्रती ऋणनिर्देश म्हणून 'असीमांत रेखा' हे पुस्तक रेखाटले. सुनिताराजे पवार म्हणाल्या, "स्त्रीचे आयुष्य एखाद्या नदीप्रमाणे असते. ती जेव्हा शांत असते, तेव्हा सर्वांना आपुलकीने सामावून घेत तिचा प्रवाह सुरू असतो. मात्र जेव्हा ती आक्रमक होते, तेव्हा महापुर येतो आणि संहार होतो. 'असीमांत रेखा' या पुस्तकातून लेखकाने त्यांच्या पत्नीच्या कर्तृत्वाची गौरवगाथा समर्पक शब्दात मांडली आहे. निश्चितच या प्रेरक साहित्यकृतीचे वाचक स्वागत करतील. लोकांना सोपी वाटणारी गृहिणीची भुमिका ही अवघड असते. श्रीकांत चौगुले म्हणाले, वसुधैव कुटुंबकम ही भारतीय संस्कृती आहे. या संस्कृतीला धरून लिहिलेले हे पुस्तक प्रत्येक घरातील कथा वाटावी अशी आहे. पुस्तकातील त्याग, सर्मपणाची भावना प्रेरणा देणारी आहे. प्रास्ताविक डॉ. पारुल सावळे यांनी केले. सूत्रसंचालन रुपाली अवचरे यांनी केले. आभार अनुप सावळे यांनी मानले.

मयुरी भूषण काटकर यांना
लग्नाच्या वाढदिवसाच्या
खूप खूप शुभेच्छा



दि.२१/०४/२०२२

शुभेच्छुक

सौ. स्वातीताई कल्याण काटकर
ग्रामपंचायत सदस्य बाजार सावंगी
ग्रामपंचायत ता. खुलताबाद,
जि. छत्रपती संभाजीनगर
शिवाजी शाहुबा जेठे
सोसायटी सदस्य ममुराबाद
जय भद्रा सार्वजनिक वाचनालय अध्यक्ष
शाम कोतकर
ताजनापूर, शांताराई महाविद्यालय, संस्थापक
अध्यक्ष
गणेश काळे, ताजणापूर



# फुलंब्री नगरपंचायतमध्ये इफ्तार पार्टी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील नगरपंचायत भाजपा तालुका अध्यक्ष प्रथम नगराध्यक्ष सुहास शिरसाट युवा मंच वतीने आयोजन करण्यात आले होते. मंगळवार 18 रोजी सायंकाळी इफ्तार पार्टीचे आयोजन फुलंब्री नगरपंचायतमध्ये करण्यात आली होती या प्रसंगी प्रमुख उपस्थिती कृषी मंत्री श्री अब्दुल सत्तार विधानसभा अध्यक्ष तथा आमदार श्री हरिभाऊ बागडे फुलंब्री प्रथम नगराध्यक्ष सुहास भाऊ शिरसाट अशपाक पटेल वहीत पठाण गुलाब पटेल अफरोज पठाण बाबुलाल पटेल गुलाम पटेल अकबर पटेल निसार सय्यद संतोष तांदळे कृष्णा गावंडे रोशन अवसरमळ भा.ज.पा शहराध्यक्ष योगेश मिसाळ रवींद्र काथार ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष राम बनसोड युवा मोर्चा तालुका अध्यक्ष वाल्मीक जाधव सर्व समाज बांधव उपस्थित होते.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# आपचे वेरूळ येथे आमरण उपोषण

## तहसीलदारांच्या आश्वासननंतर उपोषण मागे

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** वेरूळ येथील विविध वस्तू विक्रेते स्थानिक दुकानदार, हॉटेल व्यवसायिक, रसवंती चालक, हॉकर्स, फोटोग्राफर्स आणि व्हीलचेअर पूलरवाल्यांना त्वरित पुनर्वसन करावे. त्यांना विना व्यक्ती व्यवसाय करू द्यावा, परवाने उपलब्ध करून द्यावे, आदी मागण्यासाठी आम आदमी पक्षाची युवा जिल्हा उपाध्यक्ष सतीश लोखंडे यांच्या नेतृत्वात वेरूळ लेणी समोर आमरण उपोषण बुधवारी सकाळी 11 वाजता सुरू करण्यात आले होते. सायंकाळी तहसीलदार सतीश देशमुख यांनी निवेदन स्विकारले व तदनंतर ५ वाजता उपोषण मागे घेण्यात आले.
याबाबत अधिक माहिती अशी की वेरूळ येथील विविध वस्तू विक्रेते हे गेल्या 50 ते 60 वर्षांपासून वेरूळ लेणी समोर व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत होते. मात्र प्रशासनाने जी ट्वेंटी दरम्यान येथील अतिक्रमणे काढून येथील विक्रेत्यांची कुटुंब उध्वस्त केले. काही विक्रेते पुन्हा व्यवसाय करू लागले. तर काहींना तेथील स्थानिक हॉटेल चालकाच्या विरोधामुळे उपासमारीच्या समस्येस तोंड द्यावे लागत आहे. यासाठी येथील व्यवसायिकांच्या पुनर्वसनासाठी विक्रेते व आप जिल्हा उपाध्यक्ष युवक आघाडी सतीश लोखंडे यांच्या नेतृत्वात आमरण उपोषण सुरू करण्यात आले. असून विक्रेत्यांच्या मागण्या मान्य कराव्या अशी मागणी सतीश लोखंडे यांनी केली आहे. तसेच खुलताबाद येथील तहसीलदार सतीश देशमुख यांनी उपोषणकर्त्यांच्या मागण्यांची निवेदन स्वीकारले व आवश्यक तो पत्र व्यवहार महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व इतर विभागांना पुनर्वसनाचा पत्र दाखल केला असल्याचे  दाखवले. तर नंतर उपोषण करते सतीश लोखंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सायंकाळी पाच वाजता उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी राजू शेख, सागर तांबे, मनोज तांबे, राजू ढीवरे, उत्तम केदारे, अमोल भालेराव, शेखर ढीवरे, अनिकेत अजमेरा, रमणलाल सावजी, शेख इर्शाद, हे उपोषणास बसले आहेत. तसेच आम आदमी पक्षाचे मराठवाडा संघटनमंत्री सुग्रीव मुंढे,वेरूळ ग्रामपंचायत माजी सरपंच प्रकाश पाटील, ज्ञानेश्वर दुधारे, ग्रामपंचायत सदस्य हंसराज चव्हाण, जितेंद्र हजारी, नामदेव बकाल, ज्योती लोखंडे, ग्रामस्थ रमेश माळी, शेख रियाज, अयान शेख, विष्णू फुलारे, आसिफ शेख, मयूर वाघ यांच्यासह येथील होकर्स व्यावसायिक, यांनी या उपोषणस्थळी येऊन जाहीर पाठिंबा दिला होता.



# दैठणा खुर्द तालुका येथे अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** अखंड हरिनाम सप्ताह शिवाजीनगर दैठणा खुर्द तालुका घनसावंगी जिल्हा जालना येथे सप्ताहाला सातव्या दिवशाची मागणीपर किर्तन सेवा नामांकीत फडकरी किर्तनकार हरी भक्त पारायण कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांची झाली. प्रमुख उपस्थिती संगित विषारद नामदेव महाराज आगळे पैठणकर, हभप माझे जिवलग मित्र हभप देविदास महाराज ऊगले ज्ञानेश्वरी व्यासपीठ चालक सोणाजी ऊगले, दैठणा बिड गेवराई घनसावंगी अंबड तिर्थपुरी माझे मित्र डॉ दादाराव सोणवने जांमडी कन्नड भजनी मंडळी दैठणा शिवाजीनगर समस्त ग्रामस्थ भाविक भक्त मंडळी उपस्थित होते.

# ताड पिंपळगावात संत गोरोबा काका यांची पुण्यतिथी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** मौजे ताडपिंपळगाव ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथे दि. १८ एप्रिल २०२३ रोजी हिंदवी स्वराज्य ग्रुप ताडपिंपळगाव सर्कलचे सर्व पदाधिकारी व सहकारी त्याच बरोबर गावातील नागरिक यांच्या उपस्थितीत संत गोरोबा काका यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आलेली आहे यामध्ये सकाळी संत गोरोबा काका यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून अभिवादन केले व त्यानंतर आरती घेतली व नंतर श्री ज्ञानेश्वर सांडू करंगळे यांच्याकडे महाप्रसादाचा कार्यक्रम झाला व रात्री भजनाचा कार्यक्रम पार पडला यामध्ये उपस्थित लोक ताडपिंपळगाव सरपंच सौ. सुशिलाताई अरुण सोनवणे, सौ. अनिताताई सतिश शेळके, पोलीस पाटील प्रकाश दिवेकर, भाजपा किसान मोर्चाचे उपाध्यक्ष श्री. अभिमन्यू अर्जुन मगरे, शिवसेना उपतालुकाप्रमुख श्री. सतिश आण्णा शेळके, श्री संत साई बाबा महिला ग्रुप ताडपिंपळगाव, श्री शिवाजी पांढरे, बाळू सोनवणे, संजय गवळी, अशोक हिवाळे, सोमीनाथ हिवाळे, मंगेश सोनवणे, भारत हिवाळे, संतोष बल्हाळ, भारत बल्हाळ, तुकाराम गोरे व विशेष सहकार्य हिंदवी स्वराज्य ग्रुप ताडपिंपळगाव सर्कल यांचे लाभले.

# भारुडमहर्षी स्व. निरंजन भाकरे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणार्थ रहिमाबाद येथे भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारुड महर्षी स्व निरंजन भाकरे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त रहिमाबाद येथे दि. 23 एप्रिल रोजी सायं 7 वाजता परिसरातील यशवंत व्यक्तिमत्त्वांचा भव्य सन्मान सोहळा आयोजित केलेला असून विविध क्षेत्रातील यशस्वीतांचा सन्मान या ठिकाणी होणार आहे.
या कार्यक्रमाचे उद्घाटन सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पी आय सिताराम मेहत्रे तसेच पीएसआय सागर शिरसागर आणि मा. प्राचार्य नामदेवराव चापे सर यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सिल्लोडचे तहसीलदार मा. श्री विक्रांत राजपूत , ह भ प संतोष म. आढावणे, हभप अजबराव म. मिरगे, मा श्री नामदेव पा सिरसाट, लॉजिक कॉम्पुटर चे संचालक जितेंद्र पाडवे, राज कॉम्पुटर चे संचालक सचिन उपळीकर, अभिनव अकॅडमीचे संचालक शुभम पालोदे, प्रा. शिवाजी वाठोरे, सरपंच सुभाष पा. नवल, उपसरपंच सुनील खराडे, पोलीस पाटील विलास चिंचपुरे, तसेच सोसायटी चेअरमन जयराम आप्पा चिंचपुरे, याचबरोबर परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



सन्मान सोहळ्यानंतर खानदेश भूषण शाहीर शिवाजीराव पाटील, सांगलीचे युवा शाहीर प्रसाद विभुते, छत्रपती संभाजीनगरचे युवाशाही अजिंक्य लिंगायत आणि युवा शाहीर गणेश गलांडे, या दिग्गज शाहिरांचा महाराष्ट्राचा शाहिरीबाणा हा कार्यक्रम संपन्न होणार आहे, तरी परिसरातील सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन शेखर निरंजन भाकरे यांनी  केले आहे.

# दे. ऋग्वेदी ब्राह्मणतर्फे सर्वशाखीय सामूहिक उपनयन संस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक २४ मे २०२३ बुधवार रोजी कुलस्वामिनी मंगल कार्यालय, एन-६, सिडको येथे दे. ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ संभाजी नगर तर्फे सर्वशाखीय सामूहिक उपनयन संस्कार/ मौंजी व्रत्तबंध संस्कार आयोजित करण्यात आहे आहे, उपनयन संस्कार ( मुंजी ) साठी नाममात्र शुल्क फक्त - ५००१ ठेवण्यात आले आहे या शुल्कात ब्राह्मण दक्षिणा, मातृभोजन, अष्टवर्ग ( ०८ मुंजे ) पंचा सोवळे, पळी पंचपात्र, ११ लोकांचे नाष्टा, भोजन हे सर्व समाविष्ट करण्यात आले आहे.( आपण बटूसह यावे बाकी सर्व व्यवस्था मंडळ करणार आहे. ) ११ पेक्षा जास्त लोकांना भोजनाची व्यवस्था प्रति व्यक्ती रु. २५०/- अतिरिक्त प्रमाणे जास्तीत जास्त १० व्यक्तीसाठी आधी नोंदणी केल्यासच होऊ शकेल. ( गर्दीचा आकडा पाहता यावर सुद्धा नियंत्रण असू शकेल ) उपनयन संस्कार नोंदणी साठी संपर्क नरेश जोशी 9923450457, रवि जेऊरकर 9423782006, अनंत कुलकर्णी 9371586722, अमोल पांडव 9420249112, अंबादास कुलकर्णी 9422293221, श्रीपाद मुगुटे 9767400402, वैभव देशपांडे 7588930540, नरेश पटवर्धन 8999593657, मोनिका शंतनू चौधरी 9834787962, मयुरी दाभाडकर 9637936521, प्रशांत दाभाडकर 7821915297, मिलिंद दाभाडकर 9404878701, उत्कर्षा पारनेरकर 9421301762, सीमा कस्तुरे 8830155974, योगिनी देशमुख 9511709236, ऑनलाईन पेमेंट गूगल पे/ फोन पे 9422293221 या नंबरवर करावे. नोंदणी अंतिम दिनांक २०/४/२०२३ प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असून किती नोंदणी घ्यायच्या याचे सर्वाधिकार मंडळास राहतील. सुसज्ज व मोठी क्षमता असलेले तसेच नूतनीकरण केलेले कुलस्वामिनी मंगल कार्यालय. बाहेरगावाहुन येणाऱ्या बटू व सोबत कुटुंबियांची फक्त आदल्या दिवशी राहण्याची सोय होऊ शकेल. आवाहन - सध्याचा काळ दिवसेंदिवस कठीण होत असून सामुदायिक कार्यक्रमात सहभाग घेऊन कमी खर्चात व्रतबंध संस्कार करून घ्यावा व यासाठी वाचलेले पैसे बटुचे नावाने फिक्स डिपॉझिट करून शिक्षणासाठी ठेवावेत. सर्वशाखीय ब्रह्मवृंदासाठी सतत सामाजिक उपक्रम घेणारे मंडळ दे.ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ तरी जास्तीतजास्त बटूंचा यामध्ये सहभाग असावा असा आमचा प्रयत्न आहे असे मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी यांनी सांगीतले.

# सोयगावात अक्षय तृतीया व रमजान ईद एकत्रित योग

## हिंदू - मुस्लीम बांधवात आंनदाचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** यावर्षी अक्षय्य तृतीया व रमजान ईद २२ एप्रिलला शनिवारी साजरी होणार आहे.
दरवर्षी अक्षय्य तृतीया हा सण वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षाच्या तिसऱ्या दिवशी साजरा केला जातो. साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानला जाणारा अक्षय्यतृतीया व इस्लाम धर्मीयांचा महत्वाचा मानला जाणारा रमजान ईद हे सण जवळपास ५१ वर्षानंतर हे दोन्ही सण एकत्रित येण्याचा योग जुळून आला होता. यामुळे सर्वत्र चैतन्याचे वातावरण पहावयास मिळत होते.त्यातच हिंदू धर्मात अक्षय्य तृतीयेला खूप महत्त्व आहे. या दिवसाला शुभ तिथी मानले जाते. अक्षय्य तृतीया हा विवाह, गृहप्रवेश, यासह कोणतेही नवीन कार्य करण्यासाठी शुभ मुहूर्त मानला जातो. म्हणजेच या दिवशी शुभ कार्य करता येते. हिंदू कॅलेंडरनुसार, दरवर्षी अक्षय तृतीया वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तिसऱ्या दिवशी येते. यादिनाचे औचित्य साधून जवळपास सर्वांच्या घरी पुरणपोळी व आमरसाचा बेत आखण्यात आला होता.

मुस्लिम कॅलेंडरमध्ये चंद्रदर्शनाला महत्त्व असून, चंद्रदर्शन झाल्यावर ईद-उल-फितर म्हणजेच रमजान ईद सजरी करण्यात आली. ईदनिमित्त खाद्यपदार्थांची रेलचेल ही सर्वच मुस्लिम बांधवांच्या घरी दिसून आली. त्यातच दूध, सुकामेवा आणि शेवयापासून बनवलेल्या शीर खुरम्याचे विशेष बेत आखण्यात आला होता. दोन्ही सणाचे औचित्य साधून सोयगाव, फत्तेपूर, देवळगाव गुजरी व सावळदबारा बाजारपेठेत खरेदीसाठी ग्राहकांची एकच गर्दी दिसून आली.
**मो .आरिफ मो .लुखमान उपसरपंच सावळदबारा ता सोयगाव**

# सावित्रीबाई फुले माध्य. विद्यालयात उन्हाळी वर्गास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात एस.एस.सी. उन्हाळी वर्गास प्रारंभ झाला.  शाळेच्या मुख्याध्यापिका व्ही.व्ही. घोंगडे  यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शुभारंभ सोहळ्यात सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले . प्रेरणा वडाळे या विद्यार्थिनींनी यावेळी 'माय सावित्री तू महान 'हे प्रेरणा गीत सादर करून साऱ्यांनाच मंत्रमुग्ध केले. गायत्री घोंगडे आणि तृप्ती घोंगडे या विद्यार्थिनींनी वर्गाच्या वतीने मुख्याध्यापिकांचा सत्कार केला. यावेळी 'एकच ध्यास सर्वांगीण गुणवत्ता विकास या ध्येयाने प्रेरित होऊन दहावीसाठी वर्षभर विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे  सांगितले. हरीभाऊ राऊत यांनी यावेळी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि दहावीच्या उंबरठ्यावरील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्गशिक्षक शंकर भामेरे यांनी सूत्रसंचालन केले. बी. एन. जाधव यांनी आभार मानले.



# जळगाव येथील धनश्री जाधव यांना डॉ. मणीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यातील धनश्री राजीव जाधव व ललित राजीव जाधव याची दखल घेऊन उरुळीकांचन पुणेः राष्ट्रभक्तीने प्रेरित होउन समर्पित भावनेने विवीध क्षेत्रांत निष्काम कर्मयोगी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना पद्मश्री डॉ मणीभाई राष्ट्रसेवा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. मॅगसेसे पुरस्कार प्राप्त पद्मश्री डॉ मणीभाई देसाई प्रतिष्ठान नीती आयोग भारत सरकार संलग्नित संस्थेच्या वतीने वरील पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ रविंद्र भोळे समाजसेवक, प्रवचनकार प्रबोधनकार, अपंगसेवक ह्यांनी येथे व्यक्त केले. ह्या कार्यक्रमासाठी खासदार उन्मेषदादा भैयासाहेब



पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष असणार आहेत तर आमदार सुरेश तथा राजुमामा भोळे, डॉ संजय कोलते यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा दि.२७/४/२३ रोजी येरवडा पुणे येथे धनश्री जाधव,ललित जाधव व इतर मान्यवरांना आयोजित कार्यक्रमात प्रधान करण्यात येणार आहे.ह्या वर्षीच्या २०२३ चा पुरस्कार डॉ मणीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार जाहीर करण्यात आलेल्यामध्ये ,, सौ रीता राजपूत लेखिका कावियत्री जळगाव, धनश्री राजीव जाधव स्पोर्ट्स जळगाव, ललित राजीव जाधव स्पोर्ट्स जळगाव हा पुरस्कार जाहीर झाल्याने जळगाव येथील मा.जिल्हाअधिकारी साहेब,मा.आ.चंद्रकांत पाटील,मा. पोलिस अधिक्षक साहेब, विशेष सुरक्षा विभाग,व पो.हवा. राजीव जाधव विविध क्षेत्रातील मान्यवरांनी धनश्री राजीव जाधव व ललित राजीव जाधव यांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात येऊन त्यांना गौरविण्यात आले.व पुढील वाटचालीच्या शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या.जळगाव जिल्हात धनश्री राजीव जाधव व ललित राजीव जाधव जळगाव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अकलूजचा पंकज लोंढे झाला तालुका कृषी अधिकारी..!

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**

**पिलीव :** महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या कृषी सेवा पदांसाठीच्या परीक्षेसाठी अकलूजचा सुपुत्र पंकज सचिन लोंढे याची तालुका कृषी अधिकारी (वर्ग-२) या पदावर निवड झाली आहे. त्याने अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये पाचवे स्थान प्राप्त केले आहे. सध्या कोरेगाव तालुक्यामध्ये मंडल अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सचिन वसंत लोंढे यांचा पंकज लोंढे हा मुलगा असून त्याने



राहुरी येथे नुकतेच एम. एस्सी. (कृषी) पूर्ण केलेले आहे. पंकजचे प्राथमिक ते माध्यमिकपर्यंतचे शिक्षण सातारा येथील रयत हायस्कूलमध्ये झालेले असून बीएससी ऍग्री अकलूज येथील रत्नाई कृषी महाविद्यालयामध्ये पूर्ण केलेले आहे. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी तो सध्या राहुरी येथे आहे .पहिल्याच प्रयत्नात त्याने घवघवीत यश प्राप्त केले असून पुढील काळामध्ये आणखी वेगवेगळ्या परीक्षेच्या माध्यमातून उच्च पदासाठी प्रयत्न करणार असल्याचे पंकजने सांगितले. पंकजच्या या यशामध्ये त्याने आपली आई- सौ.मनिषा,वडील सचिन लोंढे ,आजी सुभद्रा लोंढे चुलते प्रविण लोंढे सर, तुषार लोंढे व सर्व कुटुंबीय व मित्र परिवार आणि शिक्षकवर्ग यांचा वाटा असल्याचे नमूद केले. पंकजच्या या यशाबद्दल संपूर्ण तालुक्यातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.



# शिवगाव-पाथरी येथे सकल राजपूत मेळावा तयारी बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा संस्कृतीक मन्डळ च्या मैदानावर पुढिल मे महिन्याच्या रविवार( ता, १४ मे, )रोजी राज्य स्तरीय वीर शिरोमनी हिंदवी सुर्य महाराणा प्रतापसिंह सकल राजपूत/परदेशी मेळावा होणार आहे. या मेळाव्यात भारत सरकारचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह, तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अन्य मंत्री उपस्थित राहणार आहेत. त्या अनुषंगाने बुधवार(ता.१९ )रोजी रात्री आठ वाजता तालुक्यातील शिवगाव, पाथ्री येथील सकल राजपूत समाज व गावकरी बंधू-भगिनींची जनजागृती बैठक घेण्यात आली. या मेळाव्या बाबत माहिती देण्यात आली. संभाजीनगर कोअर कमेटीचे डॉ,जीवन राजपुत, भगवानसिंह डोभाळ, वैजापुरचें सामजिक कार्यकर्ता धोंडीरामसिंह राजपूत, मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी उपस्थित बंधू-भगिनी याना या मेळाव्या बाबत व शासनाकडे करावयाच्या मागण्या बाबत सविस्तर मार्गदर्शन करुन या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त राजपूत-परदेशी बंधू भगिनी यानी येण्याचा संकल्प केला. या प्रसंगी प्रेमसिंग राजपूत, सुभाष गोमलाडू, प्रमोद ऊसारे, पारस बहरे वैजापूर, शिवगाव -पाथ्री येथील ग्रामपंचायत सदस्य विजयसिंग जारवाल, मदन गोमंलाडू, रामसिंग जारवाल, कांतीलाल दुमाले, मधू डुमाले, प्रेमसिंग गोमंलाडू, भीमसिंग राजपूत व समस्त गावकरी मोठ्या सन्खेने उपस्थित होते.



# बोरी तलावातील वृक्षतोड थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील बोरी येथील गाव तलाव क्षेत्रात वृक्ष लागवड केलेल्या वड व पिंपळ या झाडांची सौर ऊर्जा कंपनी कडून होणारी कत्तल व तोड थांबवावी, अशी मागणी तहसीलदार, जिंतूर व सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जिंतूर यांच्याकडे आदर्श बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष गजानन चौधरी यांनी केली आहे. जिंतूर तालुक्यातील बोरी येथील आदर्श बहुउद्देशीय प्रतिष्ठान व पतंजली परिवार च्या वतीने सन २०१६-१७ मध्ये गावा जवळील महसूल विभागाच्या तलाव क्षेत्रात लोक सहभागातून वड व पिंपळ या वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली होती. सलग तीन वर्ष या वृक्ष रोपांचे संगोपन व संवर्धन केल्यानंतर सध्या ही झाडे वीस ते पंचवीस फुटांची झाली आहेत. काही महिन्यापूर्वी सौर ऊर्जा कंपनीकडून पर्यायी व्यवस्था असतानाही जाणीवपूर्वक या झाडांच्या वरून विद्युत तारा नेल्या. हे काम करत असताना सौर ऊर्जा कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांनी काही झाडांची कत्तल केली तसेच अशा प्रकारचा गैरप्रकार सध्या देखील चालू आहे, असे निवेदनात नमूद केले आहे. आदर्श संस्थेचे अध्यक्ष गजानन चौधरी यांनी दि १९ एप्रिल रोजी याबाबत तहसीलदार, जिंतूर व सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जिंतूर यांना निवेदन दिले. या निवेदनात झाडांची बेकायदेशीररित्या विनापरवानगी होत असलेली कत्तल व तोड करू नये, असा आदेश संबंधित सौर ऊर्जा कंपनीला द्यावा. अशी मागणी करण्यात आली आहे.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर